॥ गणेश चतुर्थी ॥
आगमन गणरायाचे
वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटी समप्रभ निर्विघ्नं कुरुमेदेव सर्वकार्येषु सर्वदा
आमचे सर्व वाचक, जाहिरातदार, हितचिंतक यांना गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा !
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २२४ । किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार १५ /०९/२०२६ । पाने - ८

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# ‘गणपती बाप्पा मोरया!’ घरोघरी बाप्पा विराजमान



युवावार्ता (प्रतिनिधी)

गणरायाचे घरोघरी उत्साहात आगमन झाले असून, गणेशोत्सवाच्या निमित्ताने सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. घरगुती गणपतीसह सार्वजनिक गणेशोत्सव ठिकाणी गणराय मुर्तीना विराजमान करण्यात आले आहे. विधानसभा आमदार अमोल खताळ यांनी सपत्नीक शिवसेना संपर्क कार्यालयात बाप्पाची विधिवत पूजन करून गणरायाला विराजमान केले. विधानपरिषद आमदार सत्यजीत तांबे यांच्या येथील प्रभा निवासस्थानीही नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे व सहपरिवार गणरायाची विधिवत स्थापना करण्यात आली. तर काँगेसचे जेष्ठ नेते माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन कार्यालयात व सुदर्शन निवासस्थानी काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष डॉ. जयश्री थोरात व डॉ. हसमुख जैन यांच्या हस्ते पुजा विधी करून लाडक्या गणरायाला विराजमान करण्यात आले.

अतिशय भक्तीमय वातावरणात अबालवृद्धांसह सर्वांचा हा लाडका उत्सव आहे. त्यामुळे पुढील दहा दिवस शहरात आणि घराघरात या उत्सवाची धून वाजवली जाणार आहे.

दरम्यान गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजाला एकत्र आणणारा, आनंदाची देवाण-घेवाण घडवून आणणारा आणि सकारात्मक विचारांची देवाण-घेवाण करण्याची संधी देणारा उत्सव आहे, असे आमदार सत्यजीत तांबे यांनी सांगितले. तर आमदार अमोल खताळ यांनी हा उत्सव आनंदात साजरा करा. आपला उत्साह आणि उत्सव इतरांना त्रासदायक ठरू नये याची काळजी घ्यावी. प्रशासनाने देखील प्रत्येक ठिकाणी नियमांवर बोट न ठेवता समजूतदारपणा दाखवावा. हा संपूर्ण उत्सव निर्विघ्नपणे आणि सर्वांचे कल्याण करो अशी भावना व्यक्त केली.

दहा दिवसाच्या या उत्सवासाठी सर्व सार्वजनिक गणेश मंडळे, धार्मिक व सामाजिक कार्यकर्ते त्याचबरोबर प्रशासन सज्ज झाले आहे. डीजे बंदीची घोषणा झाल्याने सर्व सामान्य नागरीकांनी समाधान व्यक्त केले. तर दुसरीकडे कार्यकर्त्यांच्या आनंदावर विर्जन देखील पडले आहे. दहा दिवस हा उत्सव आनंदात साजरा करावा.

## रायतेवाडी रस्त्यावर भीषण अपघात

### भरधाव कारची दुचाकीला पाठीमागून धडक; युवकाचा जागीच मृत्यू



युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहरातील नाशिक-पुणे बायपासवरील संगमनेर खुर्द येथील कचराडेपो परिसरात शनिवारी रात्री साडेदहाच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. सागर तान्हाजी दवंगे (रा. हिवरगाव पावसा, ता. संगमनेर) असे मृत युवकाचे नाव आहे. या अपघातानंतर XUV चालकाने वाहन घटनास्थळी सोडून पलायन केले. मात्र, पोलिसांनी त्याचा शोध घेत त्याला ताब्यात घेतले.

मिळालेल्या माहितीनुसार, सागर दवंगे हे शनिवारी रात्री दुचाकीवरून आपल्या घरी जात होते. त्याचवेळी नाशिक-पुणे महामार्गावरील कचराडेपो परिसरात मागून भरधाव वेगाने आलेल्या एमएच १२ जेएम ८१४७ क्रमांकाच्या XUV ५०० वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की सागर दवंगे यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकी व कारचे मोठे नुकसान झाले.

अपघातानंतर XUV वाहन चालक रूपेश वाघमारे (रा. सावरगाव तळ, ता. संगमनेर) यांने वाहन घटनास्थळीच सोडून तेथून पळ काढला. तसेच वाहनाची नंबर प्लेट तोडण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने शोध घेऊन वाहन चालकाला गजाआड केले. अपघाताचे नेमके कारण वाहनाचा वेग आणि चालकाने अपघातानंतर पलायन का केले, याबाबत पोलीस तपास करीत आहेत. मयत सागर दवंगे याच्यावर रविवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ, बहिण, पत्नी, २ मुले असे परिवार आहे.

या घटनेमुळे हिवरगाव पावसा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघातातील पुढील तपशील पोलिसांच्या तपासानंतर स्पष्ट होणार आहेत.

## जिल्ह्यात डीजेवर प्रशासनाची ‘नो एंट्री’!

### गणेशोत्सवापासून दसऱ्यापर्यंत कडक बंदी; डीजे वाजवल्यास गुन्ह्यासह जप्तीची कारवाई



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : गणेशोत्सव आणि आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्हा प्रशासनाने डीजेच्या वापरावर कडक निर्बंध लागू केले आहेत. १४ सप्टेंबर २०२६ पासून गणेश स्थापना, गणेश विसर्जन, घटस्थापना ते दसरा या संपूर्ण कालावधीत डीजे वाजविण्यास बंदी राहणार आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळांवर तसेच डीजे चालक-मालकांवर गुन्हे दाखल करून साऊंड सिस्टीम जप्त करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली अपर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी शनिवार, १२ सप्टेंबर रोजी सायंकाळी याबाबत आदेश जारी केला. या आदेशामुळे जिल्ह्यातील डीजे चालक-मालकांचे धाबे दणाणले आहेत. प्रशासनाच्या आदेशानुसार केवळ डीजे वाजविण्यावरच नव्हे, तर डीजे साऊंड सिस्टीम भाड्याने देणे, पुरविणे किंवा उपलब्ध करून देण्यावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. तसेच डीजेसोबत लेझर आणि प्लाझ्मा लाईट्सच्या वापरावरही बंदी राहणार आहे.

उच्च क्षमतेच्या ध्वनीवर्धकांमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाचा लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, रुग्ण तसेच गर्भवती महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

बंदी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर किंवा साऊंड सिस्टीमच्या मालकांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३, तसेच संबंधित कायद्यांनुसार गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. वापरण्यात आलेली बेकायदेशीर साऊंड सिस्टीमही जप्त केली जाणार आहे. त्यामुळे उत्सव काळात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिस प्रशासनाची करडी नजर राहणार आहे.

दरम्यान पाथर्डी येथील शांतता समितीच्या बैठकीत भाजपचे कार्यकर्ते वायकर तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे पाथर्डी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे यांनी डीजे चालक-मालकांच्या वतीने गणेशोत्सव काळात डीजेला परवानगी देण्याची मागणी (पान २ वर)

ADVANCE GOLD -SIP- SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
गणेशोत्सव निमित्त सर्व गणेश भक्तांना हार्दिक शुभेच्छा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

आगमन विघ्नहर्त्याचे
राजपाल
संगमनेर (02425) 222226 | अ. नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
गणेशोत्सव निमित्त सर्व गणेश भक्तांना हार्दिक शुभेच्छा!
चांदीच्या दागिण्यांच्या मजुरीवर १००% सुट
सोने च्या दागिण्यांची मजुरीवर फक्त ७%
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
मो. ७५९९९९६९९९ /८२६५०३६८०७

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# संपादकीय...

## FDAची कारवाई कौतुकास्पद पण भेसळ कायमची थांबणार कधी ?

अन्न ही माणसाची मूलभूत गरज आहे आणि सुरक्षित अन्न हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार. मात्र नफ्याच्या हव्यासापोटी अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्या प्रवृत्तीमुळे या अधिकारालाच धक्का बसत आहे. सण-उत्सवांच्या काळात तर भेसळखोरांचे धाडस अधिक वाढते. दूध, खवा, पनीर, मिठाई, खाद्यतेल, मसाले, तूप अशा अनेक पदार्थांमध्ये भेसळ होत असल्याच्या घटना सातत्याने समोर येतात. अशा वेळी अन्न व औषध प्रशासनाकडून होणारी धडक कारवाई निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र मूलभूत प्रश्न अजूनही कायम आहे-कारवाई होत असतानाही भेसळ थांबत का नाही? अन्न व औषध प्रशासनाने विविध ठिकाणी छापे टाकून संशयित तसेच भेसळयुक्त अन्नसाठे जप्त करण्यास सुरुवात केली की नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी विश्वास निर्माण होतो. विशेषतः सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणावर बनावट किंवा निकृष्ट दर्जाचे खाद्यपदार्थ बाजारात येण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा काळात अचानक तपासण्या, नमुने घेणे, साठे जप्त करणे आणि दोषींवर कारवाई करणे गरजेचे आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री सूचना न देता प्रत्यक्ष बाजारपेठेत उतरून कारवाई केली, तर त्याचा निश्चितच सकारात्मक परिणाम होतो. मात्र छापा टाकला, काही टन माल जप्त केला आणि गुन्हा दाखल केला म्हणजे भेसळीचा प्रश्न संपला, असे समजणे धोकादायक आहे. कारण भेसळ हा केवळ काही दुकानदारांचा प्रश्न नाही; त्यामागे संपूर्ण पुरवठा साखळी असण्याची शक्यता असते. कच्चा माल कुठून येतो? तो कोण पुरवतो? उत्पादन कुठे होते? वाहतूक कोण करतो? साठवणूक कुठे केली जाते? बाजारात माल कोणाच्या माध्यमातून पोहोचतो? या साखळीतील प्रत्येक टप्प्याची तपासणी झाली पाहिजे. केवळ किरकोळ विक्रेत्यावर कारवाई करून मूळ सूत्रधारापर्यंत पोहोचले नाही, तर दुसऱ्या दिवशी त्याच प्रकारची भेसळ पुन्हा बाजारात येऊ शकते. विशेषतः दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा प्रश्न गंभीर आहे. पनीर, खवा, दूध, तूप किंवा मिठाईमध्ये निकृष्ट दर्जाचा कच्चा माल वापरल्यास त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ शकतो. स्वस्तात माल तयार करून जास्त नफा मिळवण्याच्या नादात काही व्यावसायिक ग्राहकांच्या आरोग्याशी खेळतात. ग्राहकाला मात्र दिसते ते आकर्षक पॅकेजिंग, चव आणि किंमत. त्यामागील गुणवत्ता तपासण्याची क्षमता प्रत्येक ग्राहकाकडे असेलच असे नाही.

भेसळखोरांविरोधातील कारवाईत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे दोष सिद्ध झाल्यानंतरची शिक्षा. छापा पडला, माल जप्त झाला, नमुने प्रयोगशाळेत गेले; पण त्यानंतर प्रकरण किती पुढे गेले? दोषीला शिक्षा झाली का? त्याचा परवाना रद्द झाला का? पुन्हा व्यवसाय करण्यावर निर्बंध आले का? या प्रश्नांची उत्तरे सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत नाहीत. कारवाईचा धाक निर्माण करण्यासाठी तपासणीइतकीच महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिचा शेवटपर्यंत पाठपुरावा. आज भेसळखोरांना जर 'पकडले गेलो तरी काही दिवसांत सर्व सुरळीत होईल' अशी मानसिकता निर्माण झाली असेल, तर ती मोडणे आवश्यक आहे. दंडाची रक्कम, गुन्ह्याची तीव्रता आणि शिक्षा यामध्ये पुरेसा प्रतिबंधक परिणाम असला पाहिजे. आरोग्याशी संबंधित गुन्ह्यांकडे केवळ आर्थिक दंडाच्या दृष्टिकोनातून पाहता कामा नये. कारण भेसळयुक्त अन्नामुळे एखाद्या व्यक्तीच्या आरोग्यावर तात्काळ परिणाम होईलच असे नाही; परंतु दीर्घकाळात त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. याचबरोबर ग्राहकांची भूमिका देखील महत्त्वाची आहे. स्वस्त दरात मिळणाऱ्या वस्तूंकडे आकर्षित होणे स्वाभाविक आहे; परंतु 'स्वस्त' म्हणजे 'चांगले' असा समज धोकादायक ठरू शकतो. पॅकेजिंगवरील उत्पादन तारीख, वापरण्याची अंतिम तारीख, उत्पादकाची माहिती, परवाना क्रमांक, लेबलवरील तपशील आदी तपासण्याची सवय ग्राहकांनी लावली पाहिजे. संशयास्पद पदार्थ किंवा बनावट उत्पादन आढळल्यास संबंधित यंत्रणेकडे तक्रार करण्याचे धैर्यही दाखवले पाहिजे. प्रशासनानेही नागरिकांच्या तक्रारींना केवळ कागदोपत्री प्रतिसाद न देता त्यावर तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तपासणी अधिक प्रभावी करता येऊ शकते. वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांची स्वतंत्र नोंद ठेवणे, जोखमीच्या उत्पादनांची नियमित तपासणी करणे, प्रयोगशाळेतील नमुना तपासणीचा कालावधी कमी करणे आणि कारवाईचा सार्वजनिक अहवाल प्रसिद्ध करणे यामुळे पारदर्शकता वाढू शकते. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सणासुदीपुरतीच मोहीम मर्यादित राहू नये. गणेशोत्सव, दिवाळी किंवा इतर सणांच्या आधी काही दिवस छापे टाकणे आणि नंतर तपासणीची तीव्रता कमी करणे हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. भेसळीविरोधातील मोहीम ही वर्षभर सुरू असली पाहिजे. कारण नागरिक सणाच्या दिवशीच अन्न खात नाहीत; रोज खातात. त्यामुळे तपासणीही रोजच्या बाजारव्यवस्थेचा भाग झाली पाहिजे.

# गणेश उत्सवानिमित्त थोरात कारखान्यावर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

युवावार्ता(प्रतिनिधी )

संगमनेर- काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या अमृत सांस्कृतिक मंडळाच्या वतीने गणेशोत्सव काळामध्ये कारखाना कार्यस्थळावर १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या काळात विविध दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपाध्यक्ष कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर व कार्याध्यक्ष रामदास तांबडे यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या प्रेरणेतून अमृत सांस्कृतिक मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव काळामध्ये कारखाना कार्यस्थळावर विविध दर्जेदार कार्यक्रम होत असतात. यावर्षी सोमवार दिनांक १४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता श्री गणेशाची स्थापना याचबरोबर बुधवारी १६ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० वाजता मराठी चित्रपट सृष्टीतील अभिनेते संतोष पवार, विनय येडेकर, आनंदा कारेकर,सानिका शिंदे,सोनाली मगर,आदित्य गटे,संकेत बीवलकर यांच्या उपस्थितीत ए भाऊ डोकं नको खाऊ हे विनोदी नाटक होणार आहे. तर गुरुवारी १७ सप्टेंबर रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत रांगोळी व मेहंदी स्पर्धा. शनिवारी १९ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८.३० वाजता महाराष्ट्रातील प्रसिद्ध नाटक व सिने अभिनेते संजय नार्वेकर विजय पटवर्धन यांच्या उपस्थितीत भ्रमाचा भोपळा हे होणार आहे. सोमवार २१ सप्टेंबर रोजी सत्यनारायण महापूजा व रात्री अमृतेश्वर भजनी मंडळाचे भजन होणार आहे. मंगळवारी २२ सप्टेंबर रोजी रात्री ८.३० वाजता ऑर्केस्ट्रा रंगतरंग हा होणार आहे तर बुधवारी २३ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता संगीत खुर्ची व चमचा लिंबू होणार आहे. गुरुवारी २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता राहणे प्रस्तुत खेळ पैठणीचा हा लय भारी संगमनेरी हा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवारी २५ सप्टेंबर रोजी साडेनऊ वाजता श्रींची मिरवणूक व विसर्जन होणार आहे.

या कार्यक्रमासाठी काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा.आ.डॉ.सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे,डॉ.जयश्रीताई थोरात,कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग पाटील घुले सर्व संचालक उपस्थित राहणार आहेत. तरी या गणेश मंडळाच्या कार्यक्रमांसाठी अमृतनगर, घुलेवाडी, मालदाड ,वेल्हाळे, गुंजाळवाडी, सुकेवाडी, संगमनेर व परिसरातील सर्व नागरिक महिला व युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन उपाध्यक्ष जगन्नाथ घुगरकर, कार्याध्यक्ष रामदास तांबडे,खजिनदार भारत देशमुख, आदींसह विविध पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# जिजामाता स्कूलमध्ये बैलपोळ्याचा उत्साह



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शेतकऱ्यांच्या जीवनाशी आणि महाराष्ट्राच्या कृषिसंस्कृतीशी अतूट नाते असलेला बैलपोळा सण जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये पारंपरिक वातावरणात व उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेच्या प्रांगणात सजविण्यात आलेल्या खिल्लारी बैलजोडीचे विधिवत पूजन व औक्षण करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे अध्यक्ष, उपाध्यक्षा, प्राचार्या, उपप्राचार्या, समन्वयक व विद्यार्थ्यांच्या शुभहस्ते बैलपूजन करून झाली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. सजविलेल्या बैलजोडीला पुरणपोळीचा नैवेद्य व बाजरी खाऊ घालण्यात आली. बैलांना सजविणे, त्यांचे औक्षण करणे आणि त्यांच्या कष्टांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे या परंपरांचा विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला.

यावेळी सह शिक्षक श्री. प्रशांत त्रिभुवन यांनी बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करणारे भावपूर्ण मराठी गीत सादर केले. त्यांच्या सुरेल गायनामुळे कार्यक्रमाला विशेष भावनिक स्पर्श लाभला. सहशिक्षिका दिपाली गुंजाळ मॅडम यांनी विद्यार्थ्यांना बैलाचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व व उपयोग याविषयी माहिती दिली. माणसाने नेहमी प्राणीमात्रांवर दया करावी, अशी मोलाची शिकवण देणारी गोष्टही त्यांनी चिमुकल्यांना सांगितली.

उपप्राचार्यांनी भारतीय संस्कृती, मराठी महिने, सणवार यांचे पारंपरिक महत्त्व व त्यामागचा वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांसमोर स्पष्ट केला.

विद्यार्थ्यांना बैलपोळा सणाचे महत्त्व, शेतीच्या कामातील बैलांचे योगदान आणि भारतीय कृषि संस्कृतीतील त्यांचे स्थान याविषयी माहिती देण्यात आली. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राणीप्रेम, कृतज्ञता आणि आपल्या पारंपरिक संस्कृतीचे जतन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. पुस्तकी ज्ञानासोबतच विद्यार्थ्यांना आपल्या मातीशी, शेतीशी आणि समृद्ध लोकपरंपरांशी जोडणारा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## पान १ वरून जिल्ह्यात डीजेवर...

पोलिस प्रशासनाकडे केली होती. मात्र, प्रशासनाने ही मागणी स्पष्टपणे फेटाळून लावली. अपर जिल्हा पोलिस अधीक्षक वैभव कलबुर्मे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार ध्वनीप्रदूषणाच्या नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. जिल्ह्यात कुठेही गणेशोत्सव काळात डीजेचा वापर झाल्यास गुन्हा दाखल करून साऊंड सिस्टीम जप्त केली जाईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. उत्सव काळात प्रत्येक तालुक्यातील शहरांमधील गणेश मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशा सूचनाही प्रशासनाने दिल्या आहेत. गणेश मंडळे आणि नागरिकांनी डीजेऐवजी पारंपरिक ढोल-ताशांच्या माध्यमातून शांततेत आणि उत्साहात उत्सव साजरा करावा, तसेच शासकीय नियमांचे काटेकोर पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.


Yuvavarta.in
VISIT INSTAGRAM
daily_yuvavarta
VISIT Facebook
Daily yuvavarta

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME IS
IRUM ISMAIL SHAIKH
TO NEW NAME AS
IRAM ISMAIL SHAIKH
ADD -5858,KOLHEWADI ROAD, NEAR NATIONAL ENGLISH SCHOOL,SANGAMNER. TAL - SANGAMNER DIST, AHILYANAGAR,422605,

आकर्षक पगारावर जागा भरणे आहे
सुपरवायझर
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वत:ची टु व्हिलर असणे अवश्यक)
ऑफिस असिस्टंट
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
उमंग इन्फ्राटेक
7875455777

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

WASAN TOYOTA
Sangamner
WE ARE HIRING

| POST | NAMEEXPER | IENCEQUALIFICATION & SKILLS | VACANCY |
|---|---|---|---|
| TEAM LEADER | 3-4 Years | Graduate • Sales Team Handling • Computer • Reporting | 1 |
| SALES OFFICER | 1–2 Years | Graduate • Sales • Computer | 4 |
| OFFICE BOY | Fresher | 10th Pass • Hardworking • Punctual | 1 |

★ Attractive Salary + Good Incentives ★
Walk-in 15 September 2026
Contact: 9881 2404 56 Email: hr@wasantoyota.com
Address:Panchayat SamitiJawal, SangamnerNagar Road, Sangamner
Interested candidates can walk-in directly for interview on the above date.

पाहिजेत
रिषभ गोल्ड ॲण्ड डायमंड
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

पाहिजेत
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
DALARAM VIRARAM CHAUDHARI
TO NEW NAME
DALARAM VIRA CHAUDHARI
BY AFFIDAVIT NO 998/2026 DATE- 09/09/2026
VAIBHAV COMPLEX, NAVIN NAGAR ROAD,OPP NAGARE HOSPITAL, TAL.SANGAMNER AHILAYANAGAR,422605

CHANGE IN NAME
I ABDUL REHMAN TAHER KHA
I HAVE CHANGE MY DAUGHTER OLD NAME
ARIBA ABDUL RAHEMAN KHAN
NEW NAME AS
ARIBA ABDUL REHMAN KHAN
ADRESS - NEAR QUBA MASJID, JORVE ROAD, RAHEMATNAGAR SANGAMNER 422605

पाहिजेत
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

फ्लॅट विकणे आहे
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड, पर्पल ब्लुम सोसायटी, साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108 क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर, 1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी किचन ट्रॉली, बेड, सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718

पाहिजेत
अमृता चहासाठी
सेल्समन प्रमोटर
(२ जागा, महिला)
पगार - १००००
(बेसिक + इंसेन्टीव्ह)
संपर्क- एस. आर. सेल्समन कार्पोरेशन (मार्केट यार्ड, संगमनेर)
7030501936

पाहिजेत
ऑफिस बॉय (प्युन)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
स्वत:चे वाहन आवश्यक
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

पाहिजेत
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड, ताजने मळी, संगमनेर
- संपर्क -
9921245753

जागा विकणे आहे
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

पाहिजेत
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

भाड्याने देणे आहे
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

पाहिजेत
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

पाहिजेत
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सिक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

नोकरीची सुवर्णसंधी
श्री गणेश टायर्स
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९९८६२७५१

पाहिजेत
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849







# अभियांत्रिकीचा महामेरू : भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या




## इंजि. हरिभाऊ सुमन कारभारी गिते

**मुख्य अंभियता, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक व छत्रपती संभाजी नगर**



जलसंपदा, सिंचन, औद्योगिकीकरण, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मितीची दूरदृष्टी यांचा अद्भुत संगम म्हणजे भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या. १५ सप्टेंबर हा दिवस भारतात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो, तो त्यांच्या जन्मदिनाच्या स्मरणार्थ. अभियंता हा केवळ पूल, धरणे किंवा इमारती उभारणारा तंत्रज्ञ नसून समाजाच्या आणि राष्ट्राच्या भवितव्याला आकार देणारा कर्तृत्ववान व्यक्ती असतो, हे आपल्या कार्यातून सिद्ध करणारे सर एम. व्ही. आधुनिक भारताच्या अभियांत्रिकी आणि औद्योगिक विकासातील एक युगपुरुष होते. भारत सरकारनेही त्यांच्या अभियांत्रिकी व राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचा गौरव करत १९५५ मध्ये त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान केला.

**संघर्षातून घडलेले व्यक्तिमत्त्व**

सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचा जन्म १५ सप्टेंबर १८६१ रोजी तत्कालीन म्हैसूर संस्थानातील, आजच्या कर्नाटक राज्यातील चिक्कबळ्ळापूर जिल्ह्यातील मुदेनहळ्ळी येथे झाला. त्यांचे वडील श्रीनिवास शास्त्री हे संस्कृतचे विद्वान होते आणि आयुर्वेदाचेही ज्ञान त्यांना होते. आईचे नाव व्यंकम्मा. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी वडिलांचे निधन झाल्याने कुटुंबावर आर्थिक संकट आले. मात्र या परिस्थितीसमोर न झुकता त्यांनी शिक्षणाची वाट धरली. चिक्कबळ्ळापूर येथे प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी बंगळुरू येथील सेंट्रल कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. १८८१ मध्ये मद्रास विद्यापीठातून बी.ए. पदवी घेतल्यानंतर त्यांनी पुण्यातील तत्कालीन College of Science, आजचे College of Engineering Pune (COEP) येथे स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. १८८३ मध्ये त्यांनी डउए आणि ऋउए परीक्षा उत्तीर्ण केल्या आणि त्यात उत्कृष्ट कामगिरी केली. शिक्षण पूर्ण होताच १८८४ मध्ये ते मुंबई सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागात सहाय्यक अभियंता म्हणून रुजू झाले. नाशिक, खंडेश, पुणे, सुरत अशा विविध भागांत त्यांनी काम केले. सुरुवातीपासूनच त्यांच्या कामात काटेकोर नियोजन, तांत्रिक अचूकता, वेळेचे भान आणि सार्वजनिक हिताची जाणीव दिसून येत होती.

**पाण्याचे नियोजन आणि अभियांत्रिकीतील नावीन्य**

विश्वेश्वरय्यांच्या अभियांत्रिकी कारकिर्दीचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे जलसंपदा व्यवस्थापन. पाणी हा केवळ नैसर्गिक स्रोत नसून शेती, उद्योग, आरोग्य आणि शहरांच्या विकासाचा आधार आहे, ही त्यांची स्पष्ट भूमिका होती. सिंध प्रांतातील सक्कर येथे त्यांनी पाणीपुरवठा योजनेवर महत्त्वपूर्ण काम केले. पाणीपुरवठा, सिंचन, सांडपाणी व्यवस्थापन आणि पूरनियंत्रण यांसारख्या विषयांकडे त्यांनी एकात्मिक दृष्टिकोनातून पाहिले. पुढे हैदराबादमध्ये मुसळधार पावसामुळे आलेल्या पुराच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पूरसंरक्षण व्यवस्थेच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. विशाखापट्टणम बंदराला समुद्राच्या धूपेपासून वाचविण्याच्या कामातही त्यांचे योगदान होते. त्यांच्या नावावर असलेले सर्वात प्रसिद्ध तांत्रिक योगदान म्हणजे स्वयंचलित जलद्वारांची (-utomatic Weir Floodgates) रचना. १९०३ मध्ये पुण्याजवळील खडकवासला जलाशयात ही प्रणाली वापरण्यात आली. जलाशयाची



साठवणक्षमता वाढवतानाच सुरक्षिततेची काळजी घेणारी ही कल्पना त्या काळात अत्यंत अभिनव होती. या तंत्रज्ञानाचे पेटंट त्यांनी घेतले; मात्र त्यातून मिळणाऱ्या रॉयल्टीचा वैयक्तिक लाभ त्यांनी घेतला नाही, अशी नोंद विविध संदर्भांत आढळते. पुढे अशा जलद्वारांचा वापर इतर जलसंधारण प्रकल्पांतही करण्यात आला. सिंचन क्षेत्रात त्यांनी 'ब्लॉक सिस्टिम' विकसित केली. उपलब्ध पाण्याचे नियोजनबद्ध वाटप करून विविध भागांतील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळावा, हा या पद्धतीमागील उद्देश होता. जलव्यवस्थापनात तांत्रिक ज्ञानासोबतच कार्यक्षम प्रशासन किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले.

**कृष्णराज सागर : अभियांत्रिकीचा ऐतिहासिक अध्याय**

म्हैसूरच्या विकासात त्यांचे सर्वात उल्लेखनीय योगदान म्हणजे कावेरी नदीवरील कृष्णराज सागर (KRS) धरण. जलसाठा, सिंचन, पिण्याचे पाणी आणि जलविद्युत निर्मिती या सर्वांचा विचार करून आखलेल्या या प्रकल्पाने म्हैसूर प्रदेशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी चालना दिली. या प्रकल्पाच्या नियोजन व अंमलबजावणीत सर एम. व्ही. यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. आज घठड धरण आणि त्याच्या परिसरातील वृंदावन गार्डन हे म्हैसूरच्या ओळखीचा भाग आहेत; परंतु त्यामागील मूळ संकल्पना केवळ एक धरण उभारण्याची नव्हती. पाणी म्हणजे शेती, वीज, उद्योग आणि शहरांचा विकास, या व्यापक विचारातून हा प्रकल्प आकाराला आला. त्यामुळे घठड हा केवळ स्थापत्य अभियांत्रिकीचा नमुना नसून जलसंपदा नियोजनाचे उत्कृष्ट उदाहरण ठरतो.

**अभियंत्यापासून म्हैसूरच्या दिवाणापर्यंत**

१९०९ मध्ये सरकारी सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी म्हैसूर संस्थानाचे मुख्य अभियंता म्हणून काम स्वीकारले. पुढे १९१२ ते १९१८ या काळात ते म्हैसूर संस्थानचे दिवाण झाले. हा कालखंड म्हैसूरच्या आधुनिक विकासाचा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. दिवाणपद स्वीकारण्यापूर्वी त्यांनी आपल्या नातेवाईकांना स्पष्टपणे सांगितले की, सरकारी कामांसाठी कोणत्याही प्रकारच्या शिफारशीसाठी त्यांनी आपल्याकडे येऊ नये. प्रशासनात निष्पक्षता, शिस्त आणि प्रामाणिकपणा किती महत्त्वाचा आहे, याचे हे उदाहरण आजही प्रेरणादायी आहे. दिवाण म्हणून त्यांनी म्हैसूरच्या विकासासाठी केवळ सरकारी कार्यालयीन सुधारणा केल्या नाहीत, तर शिक्षण, उद्योग, बँकिंग, रेल्वे, शेती, जलसंपदा आणि तांत्रिक शिक्षण या सर्व क्षेत्रांचा एकत्रित विकास करण्याचा प्रयत्न केला.

**"Industrialise or Perish' : औद्योगिकीकरणाचा मंत्र**

विश्वेश्वरय्यांना भारताची गरिबी दूर करण्यासाठी औद्योगिकीकरण अत्यावश्यक वाटत होते. त्यांची प्रसिद्ध घोषणा होती - Industrialise or Perish - औद्योगिकीकरण करा किंवा विनाशाला सामोरे जा. त्यांच्या मते शेतीवरच अवलंबून राहून देशाची आर्थिक प्रगती होऊ शकत नाही; उद्योग, तंत्रज्ञान, कौशल्य, शिक्षण आणि आधुनिक पायाभूत सुविधा यांचा विकासही तितकाच आवश्यक आहे. म्हैसूरमध्ये त्यांच्या पुढाकाराने किंवा मार्गदर्शनाखाली अनेक औद्योगिक व आर्थिक उपक्रमांना चालना मिळाली. भद्रावती येथील लोखंड व पोलाद उद्योग, म्हैसूर साबण कारखाना, चंदनतेल उद्योग, रेशीम उद्योग, बँक ऑफ म्हैसूर, रेल्वे विस्तार, जलविद्युत प्रकल्प आणि विविध औद्योगिक संस्था यांच्या विकासात त्यांचा मोठा वाटा होता. उद्योग उभारणे एवढ्यावर त्यांचा भर नव्हता. उद्योगांना बाजारपेठ, वित्तपुरवठा, कुशल मनुष्यबळ आणि संघटनात्मक आधार मिळावा यासाठी त्यांनी संस्थात्मक विकासालाही महत्त्व दिले. म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेतही त्यांचा सहभाग होता.

**शिक्षण म्हणजे राष्ट्रनिर्मितीचा पाया**

उच्च दर्जाचे तांत्रिक शिक्षण मिळाल्याशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही, ही त्यांची ठाम धारणा होती. म्हणूनच त्यांनी तांत्रिक शिक्षण, अभियांत्रिकी शिक्षण आणि कृषी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. २७ जुलै १९१६ रोजी स्थापन झालेल्या म्हैसूर विद्यापीठाच्या स्थापनेत सर एम. व्ही. यांची निर्णायक भूमिका होती. विद्यापीठाच्या अधिकृत माहितीनुसार महाराजा कृष्णराज वोडेयार चतुर्थ आणि दिवाण सर एम. विश्वेश्वरय्या यांच्या प्रयत्नांतून हे विद्यापीठ उभे राहिले. बंगळुरू येथे अभियांत्रिकी शिक्षणाची व्यवस्था, हेब्बळ येथे कृषी शिक्षण, तांत्रिक संस्था, शैक्षणिक सुविधा आणि संशोधनाला चालना देण्यामागे त्यांची दूरदृष्टी होती. ग्रामीण भागातील लोकांपर्यंत ज्ञान पोहोचावे यासाठी त्यांनी स्थानिक भाषेतील शिक्षण, वाचनालये आणि शेतीविषयक प्रशिक्षणालाही प्रोत्साहन दिले.

**शेती, ग्रामीण विकास आणि लोकशिक्षण**

दिवाण म्हणून काम करताना त्यांनी शेतीकडे केवळ पारंपरिक व्यवसाय म्हणून पाहिले नाही. आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन, प्रयोगशीलता आणि शिक्षण यांच्या साहाय्याने शेतीची उत्पादकता वाढवता येते, असा त्यांचा विश्वास होता. शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण, कृषी शाळा, कृषी प्रयोग आणि ग्रामीण वाचनालये यांसारख्या उपक्रमांना त्यांनी प्रोत्साहन दिले. विज्ञान आणि तंत्रज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. म्हणूनच स्थानिक भाषेतून ज्ञानाचा प्रसार करण्याच्या प्रयत्नांना त्यांनी पाठिंबा दिला. कन्नड साहित्य आणि ज्ञानप्रसाराच्या चळवळींनाही त्यांच्या काळात चालना मिळाली.

**टाटा उद्योगसमूहाशी संबंध**

निवृत्तीनंतरही विश्वेश्वरय्यांनी विश्रांती घेतली नाही. उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांचे ज्ञान लक्षात घेऊन ते टाटा उद्योगसमूहाशी दीर्घकाळ सल्लागार म्हणून जोडले गेले. औद्योगिक विकासासाठी तांत्रिक गुणवत्ता, व्यवस्थापन आणि कार्यक्षमता यांना त्यांनी दिलेले महत्त्व त्यांच्या या भूमिकेतूनही दिसून येते. त्यांनी भारताच्या आर्थिक भवितव्याचा विचार करणारी पुस्तकेही लिहिली. "Reconstructing India' (१९२०) आणि "Planned Economy for India' (१९३४) या ग्रंथांमधून त्यांनी नियोजन, औद्योगिकीकरण, आर्थिक विकास आणि राष्ट्राच्या पुनर्रचनेविषयी आपले विचार मांडले.

**प्रामाणिकपणा आणि कार्यसंस्कृती**

विश्वेश्वरय्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात प्रेरणादायी पैलू म्हणजे त्यांची शिस्त, वेळेचे भान, कार्यक्षमता आणि सचोटी. पद मोठे असो किंवा जबाबदारी लहान-काम सर्वोत्तम पद्धतीने केले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या कार्यपद्धतीतून एक महत्त्वाचा संदेश मिळतो : राष्ट्रनिर्मिती मोठ्या घोषणांनी नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीने आपले काम प्रामाणिकपणे आणि उत्कृष्टतेने केल्याने होते.

भारतरत्न आणि अमर वारसा

१९५५ मध्ये भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' या देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविले. अभियांत्रिकी, शिक्षण, प्रशासन, जलसंपदा आणि औद्योगिक विकास या विविध क्षेत्रांतील त्यांच्या योगदानाची ही राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च दखल होती. १४ एप्रिल १९६२ रोजी त्यांचे निधन झाले. शतकाच्या उंबरठ्यावर पोहोचूनही त्यांची कार्यक्षमता, विचारांची व्यापकता आणि राष्ट्राच्या भविष्याविषयीची चिंता अखेरपर्यंत कायम राहिली. आज १५ सप्टेंबर हा अभियंता दिन म्हणून भारतभर साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका महान अभियंत्याची जयंती नाही; तो कल्पकता, तंत्रज्ञान, शिस्त, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रसेवा या मूल्यांची आठवण करून देणारा दिवस आहे. भारत सरकारच्या अलीकडील संदेशांमध्येही त्यांच्या अभियांत्रिकी प्रतिभेने भारताच्या आधुनिक अभियांत्रिकी क्षेत्राच्या पायाभरणीत केलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला आहे. सर विश्वेश्वरय्या यांनी धरणे बांधली, जलव्यवस्था सुधारली, उद्योग उभारले, शिक्षणसंस्था निर्माण केल्या आणि प्रशासनाला कार्यक्षमतेची दिशा दिली; पण त्यांचे सर्वात मोठे कार्य म्हणजे भारतीयांच्या मनात आधुनिक, औद्योगिक, स्वावलंबी आणि विकसित भारताचे स्वप्न निर्माण करणे. त्यांनी भविष्यातील भारताकडे केवळ स्वप्न म्हणून पाहिले नाही, तर त्या स्वप्नासाठी नियोजन, शिक्षण, तंत्रज्ञान, उद्योग आणि कठोर परिश्रम यांची भक्कम पायाभरणी केली. म्हणूनच सर एम. विश्वेश्वरय्या हे केवळ एक महान स्थापत्य अभियंता नव्हते; ते युगद्रष्टे अभियंता, कुशल प्रशासक, औद्योगिक विकासाचे पुरस्कर्ते आणि राष्ट्रनिर्मितीचे शिल्पकार होते.

आजच्या अभियंता दिनी या युगपुरुषाला विनम्र अभिवादन!




# अभियंत्यांसमोरील नवी आव्हाने आणि नव्या संधी

एखादा भव्य पूल ओलांडताना, द्रुतगती महामार्गावरून, रेल्वे, मेट्रो किंवा विमानातून प्रवास करताना, विस्तीर्ण धरणाच्या भिंतीकडे पाहताना किंवा घरात नळाला शुद्ध पाणी येताना आपण सहसा विचार करत नाही की या दैनंदिन सुलभतेमागे कोणाचे योगदान आहे. या प्रत्येक शांत, सातत्यपूर्ण आणि रचनात्मक कार्यामागे एक अभियंता उभा असतो. दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण भारतात 'अभियंता दिन' म्हणून साजरा केला जातो. हा केवळ तांत्रिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचा सन्मान नसून, समस्येतून सुनियोजित समाधान शोधणाऱ्या आणि समाजोपयोगी तंत्रज्ञान घडवणाऱ्या विचारपद्धतीचा गौरव आहे. या दिवसाचे औचित्य भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीशी जोडलेले आहे. १५ सप्टेंबर १८६१ रोजी जन्मलेले विश्वेश्वरय्या हे कुशल अभियंता आणि दूरदृष्टी असलेले राष्ट्रनिर्माते होते. जलव्यवस्थापन, सिंचन, पूरनियंत्रण आणि विकासाच्या नियोजनात त्यांनी तंत्रज्ञानाला सार्वजनिक हिताशी जोडले. शिस्त, अचूकता, कार्यक्षमता, नियोजन आणि गुणवत्तेची बांधिलकी हे त्यांच्या कार्याचे केंद्र होते. आज त्यांचे स्मरण करणे म्हणजे केवळ इतिहासाला वंदन करणे नव्हे, तर त्यांच्या मूल्यांना नव्या काळाच्या भाषेत जागे करणे होय. महाराष्ट्राच्या विकासाच्या वाटचालीतही अभियंत्यांचा ठसा खोलवर उमटलेला आहे. कोयना, जायकवाडी, उजनी, भातसा यांसारख्या सिंचन प्रकल्पांसोबत द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्ग, वंदे भारत रेल्वेसेवा यांसारख्या आधुनिक पायाभूत सुविधांच्या उभारणीमागे अनेक पिढ्यांतील अभियंत्यांचे तांत्रिक ज्ञान, खडतर परिश्रम आणि प्रतिकूल परिस्थितीत घेतलेले जबाबदार निर्णय आहेत. या पायाभूत सुविधांनी शेती, उद्योग, ऊर्जा, पिण्याचे पाणी, दळणवळण आणि प्रादेशिक विकासाला आधार दिला आहे. हा वारसा पुढील पिढीच्या अभियंत्यांसाठी अभिमानासोबत मोठी जबाबदारीही आहे. मात्र विश्वेश्वरय्यांचा काळ आणि आजचा काळ यात मूलभूत फरक आहे. त्या काळातील मोठे आव्हान होते-मूलभूत पायाभूत सुविधा उभारणे. आज नवीन सुविधा निर्माण करण्यासोबतच अस्तित्वातील पायाभूत सुविधांचे वैज्ञानिक संवर्धन, त्यांची कार्यक्षमता वाढवणे आणि त्यांना बदलत्या हवामानाच्या परिस्थितीस सक्षम बनवणे महत्त्वाचे झाले आहे. वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे नागरीकरण, बदलते पर्जन्यमान, वाढत्या ऊर्जा गरजा आणि नैसर्गिक संसाधनांवरील ताण ही आजची प्रमुख आव्हाने आहेत. ही आव्हाने एकमेकांशी जोडलेली आहेत. त्यामुळे उद्याच्या अभियंत्याला केवळ एका घटकाचा विचार न करता समग्र प्रणालीचा विचार करावा लागेल.

जलक्षेत्र हे याचे सर्वात प्रभावी उदाहरण आहे. महाराष्ट्रात एका भागात दुष्काळाची धग वाढते, तर दुसऱ्या भागात अतिवृष्टीने पूरस्थिती निर्माण होते. त्यामुळे प्रश्न केवळ 'पाऊस किती पडतो?' हा नसून, 'पडणारा पाऊस आपण किती शास्त्रीय, नियोजनबद्ध आणि कार्यक्षम पद्धतीने साठवतो, वाहून नेतो आणि वापरतो?' हा आहे. नवीन धरणे किंवा कालवे बांधण्यासोबत उपलब्ध जलसाठ्यांची कार्यक्षमता वाढवणे, गाळ व्यवस्थापन, कालव्यांचे आधुनिकीकरण व ऑटोमेशन, पाणीहानी कमी करणे, भूजल पुनर्भरण, पाण्याचा पुनर्वापर, सूक्ष्म सिंचन आणि रिअल-टाइम निर्णय प्रणाली यांचा एकात्मिक विचार करावा लागेल. भविष्यातील जलअभियांत्रिकीचा केंद्रबिंदू केवळ 'अधिक पाणीसाठा निर्माण करणे' एवढाच न राहता 'उपलब्ध पाण्याचे संवर्धन, कार्यक्षम वहन आणि विवेकपूर्ण वापर' हा असेल.

याच ठिकाणी डिजिटल तंत्रज्ञान आणि Artificial Intelligence अर्थात AI यांची भूमिका महत्त्वाची ठरते. उपग्रह छायाचित्रे, GIS, ड्रोन मॅपिंग, IoT सेन्सर्स, रिमोट सेन्सिंग आणि रिअल-टाइम डेटा यांच्या साहाय्याने नदीखोऱ्याची जलस्थिती अधिक वेगाने आणि अचूकपणे समजून



अभियंता दिन विशेष -


**इंजि. प्रवीण कोल्हे**

अधिक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे विभाग
जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन




घेता येते. भविष्यातील जलव्यवस्थापन डेटा आणि AI आधारित निर्णयव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करणार आहे. पूर व्यवस्थापनात AI आधारित मॉडेल्सच्या साहाय्याने संभाव्य पाण्याची आवक आणि पूरस्थितीचा अंदाज घेता येऊ शकतो. धरणातील पाणीसाठा व विसर्ग अधिक सुरक्षितपणे नियोजित करता येतो. सेन्सर्सच्या माध्यमातून धरणाच्या संरचनेतील विविध घटकांचे सातत्याने निरीक्षण करून संभाव्य धोके आधीच ओळखता येतात. सिंचन क्षेत्रात उपग्रहांच्या मदतीने पिकांची अवस्था आणि जमिनीतील ओलावा समजून घेऊन प्रत्यक्ष गरजेनुसार पाणीपुरवठ्याचे नियोजन करता येते. मात्र एक महत्त्वाची बाब लक्षात ठेवावी लागेल. AI हा अभियंत्याचा पर्याय नाही; तो अभियंत्याची निर्णयक्षमता आणि कार्यक्षमता वाढवणारे साधन आहे. AI माहितीचे विश्लेषण करून पर्याय सुचवू शकतो; मात्र त्यांची तांत्रिक व्यवहार्यता, भौगोलिक परिस्थिती, पर्यावरणीय संतुलन, सामाजिक परिणाम आणि दीर्घकालीन उपयुक्तता तपासून अंतिम निर्णय घेण्याची जबाबदारी अभियंत्याचीच राहणार आहे. या तांत्रिक संक्रमणामुळे अभियंत्यांच्या कौशल्यांची व्याख्याच बदलत आहे. अभियांत्रिकीच्या मूलभूत सिद्धांतांसोबत डेटा सायन्स, प्रोग्रामिंग, GIS, रिमोट सेन्सिंग, डिजिटल मॉडेलिंग आणि प्रणाली-अभियांत्रिकी यांचे ज्ञान आवश्यक ठरणार आहे. त्याचबरोबर पर्यावरण, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कायदे आणि सार्वजनिक धोरण यांची समजही महत्त्वाची ठरेल. उद्याच्या समस्या "Civil', "Mechanical', "Electrical' किंवा "Computer' अशा स्वतंत्र चौकटीत राहणार नाहीत. त्यामुळे उद्याच्या अभियंत्याला आपल्या विषयातील तज्ज्ञ असण्यासोबतच बहुविषयक समस्या सोडवणारा समन्वयक म्हणूनही काम करावे लागेल. हा बदल अभियांत्रिकी शिक्षणातही उतरायला हवा. विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे देण्यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष जीवनातील समस्या ओळखायला आणि त्यांच्या मुळाशी जाऊन कारणे शोधायला शिकले पाहिजे. गावातील पाण्याची समस्या, शहरातील पूर, कालव्यांमधील पाणीहानी किंवा पायाभूत प्रकल्पांचा वाढता खर्च अशा प्रश्नांवर प्रत्यक्ष काम करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली पाहिजे. Problem-Based Learning प्रत्यक्ष क्षेत्रात नेली पाहिजे. भारतासमोरील मोठ्या समस्या हीच पुढील पिढीच्या अभियंत्यांसाठी मोठी प्रयोगशाळा ठरू शकतात. या बदलासोबत नवकल्पना आणि उद्योजकतेची मोठी संधीही उभी आहे. पाणी, ऊर्जा, शेती, कचरा व्यवस्थापन, वाहतूक, बांधकाम, आपत्ती व्यवस्थापन आणि हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या पायाभूत सुविधा या प्रत्येक क्षेत्रात असंख्य समस्या आहेत. प्रत्येक समस्येमध्ये नव्या तंत्रज्ञानाची, संशोधनाची, उत्पादनाची किंवा स्टार्टअपची संधी दडलेली आहे.

आजचा अभियंता केवळ उपलब्ध तंत्रज्ञानाचा वापर करणारा नसून नवीन उपाय निर्माण करणारा असला पाहिजे. स्थानिक आणि किफायतशीर उपाय, ऊर्जा-कार्यक्षम तंत्रज्ञान, पाण्याचा पुनर्वापर, स्मार्ट सिंचन, डिजिटल निरीक्षण, निसर्गाधारित उपाय आणि आपत्तीपूर्व सूचना प्रणाली यांसारख्या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर नवकल्पनांना वाव आहे. उद्याचा विकास केवळ 'मोठा प्रकल्प' उभारण्यात मोजला जाणार नाही; 'योग्य तंत्रज्ञान, योग्य ठिकाणी आणि योग्य प्रमाणात' हा त्याचा अधिक महत्त्वाचा निकष असेल. या साऱ्याला एक तितकीच महत्त्वाची किनार आहे-नैतिकतेची. एखादा प्रकल्प तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे म्हणून तो सामाजिकदृष्ट्या योग्य असेलच असे नाही. आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे म्हणून तो पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत असेलच असे नाही. तंत्रज्ञानाचा वापर कोणासाठी, कशासाठी आणि कोणत्या दीर्घकालीन परिणामांसह केला जात आहे, याचा विचार करणे ही अभियंत्याची जबाबदारी आहे.

विश्वेश्वरय्यांच्या काळातील तांत्रिक साधने आजच्या तुलनेत मर्यादित होती; मात्र समस्येकडे पाहण्याची त्यांची दृष्टी व्यापक होती. आजच्या अभियंत्याच्या हातात कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह तंत्रज्ञान, क्लाउड कॉम्प्युटिंग, डिजिटल ट्विन, रोबोटिक्स आणि प्रचंड प्रमाणातील डेटा आहे. साधने बदलली आहेत; पण समाजाच्या हितासाठी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्याचे अभियंत्याचे मूलभूत कर्तव्य बदललेले नाही. उद्याचा अभियंता म्हणूनच केवळ "Engineer' राहणार नाही; तो Designer, Data Scientist, Innovator, Entrepreneur आणि Policy Thinker यांचा संगम असेल. तो धरण बांधेल, पण त्याच वेळी त्या धरणाचा नदीखोऱ्यावर होणारा परिणाम समजून घेईल. तो AI वापरेल, पण त्या तंत्रज्ञानातून घेतलेल्या निर्णयाची मानवी जबाबदारीही स्वीकारेल.

आज अभियंता दिनाच्या निमित्ताने प्रत्येक अभियंत्याने स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा-


'मी काय निर्माण केले?' यापेक्षा 'मी कोणती समस्या सोडवली?' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा नाही का? कारण उद्याच्या जगाला केवळ आणखी पूल, रस्ते किंवा धरणे नकोत. त्याला अधिक सुरक्षित शहरे, सक्षम जलव्यवस्था, कार्यक्षम शेती, स्वच्छ पर्यावरण, विश्वासार्ह ऊर्जा आणि सर्वांसाठी चांगले जीवनमान हवे आहे. हे साध्य करण्यासाठी तंत्रज्ञान लागेल; पण त्या तंत्रज्ञानाला योग्य दिशा देणारा दूरदृष्टीचा, संवेदनशील आणि जबाबदार अभियंता त्याहून अधिक आवश्यक आहे. अभियांत्रिकीचे भविष्य अधिक तंत्रज्ञानात नाही; ते तंत्रज्ञानाचा अधिक शहाणपणाने, अधिक मानवी आणि अधिक शाश्वत वापर करण्यात आहे. विश्वेश्वरय्यांनी दिलेला ज्ञान, शिस्त, कार्यक्षमता आणि राष्ट्रनिर्मितीचा वारसा आणि -खच्या युगातील नव्या शक्यता यांची सांगड घालणे ही आजच्या अभियंत्यांसमोरील मोठी जबाबदारी आहे.

आजचा अभियंता पायाभूत सुविधा उभारत आहे; उद्याचा अभियंता शाश्वत भविष्याची रचना करणार आहे. म्हणूनच अभियंता दिन हा केवळ भूतकाळातील कर्तृत्वाचा गौरव करण्याचा दिवस नाही; तो उद्याच्या भारताची दिशा ठरवण्याचा दिवस आहे.




The Geo-Tek

C - 42, Shri. Nirmal Residency CHS, 17 th. Lane, Dahanukar Colony, Kothrud, Pune- 411038.



Happy Engineer's Day
15th September

Prop. Arun T. Nehe
(M) 9922429494 / 9422521683.
Email. thegeotek@hotmail.com

Govt. Registered Civil Engineering Consultant & Contractors

We undertake the works of All types of land surveys, planning, designing, drawing, reports, estimate and preparation of DPR in WRD, MJP & PWD.

**Scope -** Canal, Road alignment survey, Command area survey, Dam line survey, Submergence survey, PDN design, Lift design, Red line Blue line River survey and design, Designing water supply and underground drainage system.

# अहिल्यानगरची जलगाथा... काल, आज आणि उद्या!!



**अभियंता दिन विशेष -**

**इंजि. उत्तमराव निर्मळ**
**सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन**

अहिल्यानगर जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १७,४१,२७१ हेक्टर (१७,०४८ चौरस किलोमीटर) आहे. जिल्ह्यात शेतीसाठी योग्य असलेले निव्वळ पिक क्षेत्र सुमारे १२,५६,५०० हेक्टर असून, प्रत्यक्ष सिंचनाखालील क्षेत्र सुमारे ४,२५,१०० हेक्टर आहे. जिल्ह्यातील सिंचनासाठी प्रामुख्याने विहिरी आणि कूपनलिकांचा वाटा सुमारे ७१.४६ टक्के आहे. उर्वरित सिंचन कालवे आणि धरणांद्वारे केले जाते.

अहिल्यानगर जिल्हा उष्ण आणि कोरड्या हवामानाच्या क्षेत्रात येत असल्याने येथे जलसंधारण आणि सिंचन प्रकल्पांना मोठे महत्त्व आहे. जिल्हा सह्याद्रीच्या पर्जन्यछायेत येत असल्याने पावसाचे प्रमाण मर्यादित आणि अनिश्चित आहे. पश्चिमेकडील डोंगराळ भागात तुलनेने अधिक पाऊस पडतो; मात्र पूर्वेकडे जाताना पर्जन्यमान कमी होत जाते. पावसाचे वितरणही अत्यंत विषम आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या एका भागात पाऊस समाधानकारक असताना दुसऱ्या भागात पावसाची प्रतीक्षा सुरू असते.

यामुळेच अहिल्यानगरच्या इतिहासात पाण्याचा शोध हा विकासाच्या इतिहासाइतकाच महत्त्वाचा ठरला आहे. पिण्याचे पाणी, शेती, उद्योग आणि वाढत्या नागरीकरणासाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्यात धरणे, कालवे, बंधारे, उपसा सिंचन योजना आणि जलसंधारणाच्या माध्यमातून मोठी जलव्यवस्था उभी राहिली आहे. मात्र आज या सर्व प्रयत्नांसमोर हवामान बदलाचे नवे आणि अधिक गुंतागुंतीचे आव्हान उभे ठाकले आहे.


अहिल्यानगरच्या पाणी प्रश्नाची तीव्रता ब्रिटिश काळातच जाणवू लागली होती. त्यामुळे भंडारदरा, दारणा आणि विसापूर यांसारख्या सिंचन प्रकल्पांची निर्मिती झाली. ही धरणे त्या काळच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी उभारलेली केवळ अभियांत्रिकीची स्मारके नव्हती, तर भविष्यातील कृषी आणि सामाजिक विकासाची पायाभरणी होती.

दारणा-भंडारदरा प्रकल्पांच्या निर्मितीनंतर पाण्याचा शाश्वत पुरवठा झाला आणि अहिल्यानगरच्या कृषी क्षेत्रात क्रांती झाली. पारंपरिक ज्वारी, बाजरी, हरभरा, मठ, मूग, कुळीथ यांसारखी पावसावर अवलंबून असलेली हंगामी पिके मागे पडून कपाशी, भुईमूग, ऊस तसेच फळबागांसारख्या बहुवार्षिक नगदी पिकांचे क्षेत्र वाढले. खाजगी तसेच नंतर सहकारी क्षेत्रातील साखर कारखाने सुरू झाले. अर्थचक्राला गती मिळाली. आर्थिक सुबत्तेबरोबरच आरोग्य, शैक्षणिक आणि औद्योगिक क्षेत्र वेगाने विकसित झाले. दुग्ध व्यवसाय व अन्य शेतीपूरक प्रक्रिया उद्योग उभे राहिले आणि बाजारपेठा नावारूपाला आल्या. सिंचन सुविधा मिळाल्याने अहिल्यानगरचा हा परिसर 'कॅलिफोर्निया' म्हणून ओळखला जाऊ लागला.

स्वातंत्र्यानंतर जलविकासाची ही वाट अधिक व्यापक झाली. मुळा, कुकडी, घोड, निळवंडे, पालखेड यांसारख्या मोठ्या सिंचन प्रकल्पांबरोबरच घाटशिळ-पारगाव, खैरी, मांडओहळ, सिना, आंबित, आढळा, भोजापूर यांसारख्या मध्यम प्रकल्पांची निर्मिती झाली. त्यायोगे जिल्ह्याच्या विविध भागांना जलसुरक्षेचा आधार मिळाला. धरणे उभारली गेली, कालवे खोदले गेले आणि जलाशयांमधील पाणी दूरवरच्या शेताच्या बांधावर पोहोचविण्याची व्यवस्था निर्माण झाली.


एका अर्थाने निसर्गाने दिलेल्या पाण्यापेक्षा अधिक पाणी निर्माण केले नाही; पण उपलब्ध पाण्याचा अधिक व्यापक आणि नियोजित उपयोग करण्याची क्षमता निश्चितच निर्माण केली.

मोठ्या धरणांबरोबरच नदीपात्रातील पाण्याचा उपयोग करण्यासाठी गोदावरी, प्रवरा आणि मुळा नदीवर साखळी पद्धतीने कोल्हापूर पद्धतीचे बंधारे उभारण्यात आले. नदीचे पाणी समुद्राकडे वाहून जाण्यापूर्वी शक्य तितके स्थानिक पातळीवर अडवणे आणि परिसरातील विहिरींना आधार देणे हा त्यामागील उद्देश होता. या बंधाऱ्यांमुळे भूजल पुनर्भरणाला चालना मिळते आणि नदीकाठच्या शेतीला अधिक स्थैर्य प्राप्त होते.




मोठ्या धरणातील पाणी जितके महत्त्वाचे, तितकेच स्थानिक पातळीवर पडलेला पाऊस स्थानिक पातळीवर अडविणे महत्त्वाचे आहे, ही जाणीव अधिक दृढ झाली. त्यातूनच 'पाणी अडवा आणि जिरवा' ही संकल्पना पुढे आली. नालाबांधणी, पाझर तलाव, मातीचे व सिमेंट बंधारे, ओढे-नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे, शेततळी आणि विविध पुनर्भरणाच्या कामांतून पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याचा प्रयत्न झाला. जलयुक्त शिवार अभियानाने या विचाराला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप दिले.

अहिल्यानगरची जलव्यवस्था केवळ जिल्ह्याच्या सीमेत पडणाऱ्या पावसावर अवलंबून राहिलेली नाही. जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागाला गोदावरी खोऱ्यातील जायकवाडी जलाशयाचा, तर दक्षिणेकडील भागाला भीमा खोऱ्यातील उजनी जलाशयाचा विविध प्रकारे जलआधार मिळाला आहे. विविध उपसा सिंचन योजना, कालवे आणि पाणीपुरवठा व्यवस्थेमुळे दुष्काळी भागांना मोठा आधार मिळाला. अनियमित मान्सून आणि पर्जन्यछाया यामुळे निसर्गाने काहीसा अन्याय केला असला तरी अथक परिश्रम, प्रदीर्घ संघर्ष आणि सूक्ष्म नियोजनातून जलव्यवस्थेची उणीव भरून काढण्याचा सातत्याने प्रयत्न झाला.




### बदलते हवामान आणि वाढता पाणी प्रश्न

गेल्या काही दशकांत अहिल्यानगरमध्ये मोठा सामाजिक आणि आर्थिक बदल झाला आहे. लोकसंख्या वाढली, नागरीकरण झाले, शहरांची संख्या वाढली, उद्योगधंदे वाढले आणि शेतीचे व्यापारीकरण झाले. ऊस, फळबागा तसेच अधिक उत्पादन देणारी नगदी पिके वाढली. पिण्याच्या पाण्याची, औद्योगिक पाण्याची आणि सिंचनाची मागणी वाढली. मात्र पाण्याचा नैसर्गिक स्रोत असलेला मान्सून आजही अनिश्चित आणि बेभरवशाचा आहे. पूर्वी जूनमध्ये २० टक्के, जुलैमध्ये ३० टक्के, ऑगस्टमध्ये ३० टक्के आणि सप्टेंबरमध्ये २० टक्के अशी पावसाची विभागणी होती. आता त्यात आमूलाग्र बदल झाला असून टोकाची विषमता आणि अनियमितता आली आहे. त्यामुळे पाणी उपलब्धता आणि पाणी मागणी यांच्यातील दरी वाढत असून पाण्यावरून जिल्ह्यांतर्गत तसेच प्रादेशिक संघर्ष निर्माण होत आहेत.

पूर्वी 'पाऊस कमी म्हणजे दुष्काळ' असे समीकरण होते. आता प्रश्न केवळ पाऊस किती पडला हा नसून-तो किती दिवसांत पडला? किती वेळात पडला? दोन पावसांमध्ये प्रदीर्घ खंड पडला का? तो शेतीच्या गरजेच्या वेळी पडला का? अतिवृष्टी किंवा ढगफुटी झाली का? पाऊस वादळी आणि अवेळी पडला का? जमिनीत किती पाणी मुरले, किती वाहून गेले, धरणात किती साठले आणि भूजलात किती भर पडली?-हे प्रश्न अधिक महत्त्वाचे झाले आहेत.

ढगफुटी, अतिवृष्टी झाली तरीही पाणीटंचाई ही आजच्या हवामान बदलाची सर्वांत मोठी विसंगती आहे. काही तासांत मुसळधार पाऊस पडतो, ओढे-नाले भरून वाहतात, नद्या दुथडी भरतात आणि काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण होते. मात्र मोठ्या प्रमाणातील पाणी जमिनीत न मुरता वाहून जाते आणि काही दिवसांत पुन्हा पाणीटंचाई सुरू होते.

अहिल्यानगरच्या शेतीसाठी पावसाचे कालानुक्रमिक वितरण अत्यंत महत्त्वाचे आहे. पेरणीच्या वेळी पाऊस उशिरा आला तर अडचण होते. पेरणीनंतर पाऊस थांबला तर उगवण धोक्यात येते. पिकांच्या वाढीच्या काळात दीर्घ खंड पडला तर उत्पादन घटते आणि काढणीच्या काळात अतिवृष्टी झाली तर तयार पिक धोक्यात येते. या विचित्र चक्रव्यूहात आज अहिल्यानगरचा शेतकरी अडकला आहे. त्यामुळे केवळ वार्षिक सरासरी पर्जन्यमान हे शेतीच्या यशाचे आणि सुरक्षिततेचे पूर्ण निर्देशक राहिलेले नाही. शेतीला योग्य वेळी योग्य प्रमाणात पाऊस हवा असतो.

### भूजलाचे वाढते संकट

धरणातील पाणी कमी झाले की ते डोळ्यांना दिसते; पण भूजल कमी झाले की संकट जमिनीखाली घडत असते. विहिरी खोल जातात, बोअरवेल अधिक खोल कराव्या लागतात, पंपिंगचा खर्च वाढतो आणि वीज वापर वाढतो. काही भागांत भूजलाची नैसर्गिक पुनर्भरण क्षमता आणि उपसा यांच्यातील संतुलन बिघडते. हे असंतुलन त्या भागाला 'डार्क झोन' अर्थात उपसाबंदीमध्ये रूपांतरित करू शकते. म्हणून भविष्यात भूजल हा अमर्याद स्रोत आहे हा गैरसमज सोडावा लागेल. जितके पाणी जमिनीतून काढतो, तितक्याच गांभीर्याने त्याच्या पुनर्भरणाचा विचार करावा लागेल.

### सन २०५० च्या अहिल्यानगरचे जलनियोजन

सन २०५० च्या अहिल्यानगरसाठी आजच यथोचित आणि कालबद्ध नियोजन करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक गावात वर्षभरात किती पाऊस पडतो, त्यातून किती पाणी उपलब्ध होते, भूजलात किती भर पडते आणि विविध क्षेत्रांत किती पाणी वापरले जाते, याचा नियमित जललेखा आवश्यक आहे. अहिल्यानगरमधील हिवरेबाजार आणि राळेगणसिद्धी या गावांत अशा प्रयत्नांना यश मिळाले आहे.

प्रत्येक पिकासाठी लागणारे पाणी आणि त्या पिकातून मिळणारे आर्थिक उत्पन्न यांचा तुलनात्मक विचार करावा लागेल. ठिबक आणि तुषार सिंचन ही केवळ अनुदानाची योजना न राहता भविष्यातील जलसुरक्षेची गरज म्हणून स्वीकारली पाहिजे. शुद्ध केलेले सांडपाणी योग्य प्रक्रियेनंतर उद्योग, उद्याने आणि इतर गैर-पेय वापरासाठी वळविल्यास गोड्या पाण्यावरील ताण कमी होऊ शकतो. पावसाचे पाणी गावाच्या नाल्यातून बाहेर जाण्यापूर्वी किती अडवता, साठवता आणि जमिनीत मुरवता येईल, याचे गावनिहाय नियोजन आवश्यक आहे. शेततळ्यांचे नेटवर्क तयार करून पावसाच्या खंड काळात पर्यायी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. बदलत्या हवामानाला तोंड देणारी पिके, सुधारित वाण आणि बदलत्या हंगामानुसार कृषी नियोजन यावरही भर द्यावा लागेल.

### जलव्यवस्थापनाची पुढची दिशा

अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या धरणांपासून लहान बंधाऱ्यांपर्यंत आणि कालव्यांपासून उपसा सिंचनापर्यंत जलव्यवस्थेची मोठी पायाभरणी झाली आहे. ही कामे अपुरी आहेत असे म्हणणे योग्य ठरणार नाही. त्यांनी जिल्ह्याच्या कृषी आणि सामाजिक विकासात मोठी भूमिका बजावली आहे. परंतु आता काळ बदलला आहे. हवामान बदलले आहे. पावसाचे स्वरूप बदलले आहे. पाण्याची मागणी वाढली आहे आणि भूजलावरचा ताण वाढला आहे. म्हणून जलव्यवस्थापनाची पुढची दिशाही बदलावी लागेल.

नव्या पाण्याची उपलब्धता करण्याबरोबरच उपलब्ध पाणी अधिक काळ, अधिक कार्यक्षमतेने आणि अधिक न्याय्य पद्धतीने वापरले जाईल यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. एखाद्या धरणात पाणी आहे म्हणून जिल्हा जलसुरक्षित होत नाही; पाणी योग्य वेळी योग्य ठिकाणी पोहोचले पाहिजे. शेतीला आवश्यक तेवढे पाणी नियमित मिळाले पाहिजे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. उद्योगाला नियोजित पाणी मिळाले पाहिजे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आजचे पाणी वापरताना उद्याच्या पिढीचा हक्क अबाधित राहिला पाहिजे. हीच खरी जलसुरक्षा!

### गोदावरी खोऱ्यासमोरील नवे आव्हान

गोदावरी खोऱ्यातील सध्याच्या अनेक धरणांचे मूळ नियोजन करताना बिगर-सिंचन पाणी वापरासाठी स्वतंत्र तरतूद नव्हती. त्यावेळी विहित लाभक्षेत्राला सिंचन करणे हे प्रमुख उद्दिष्ट होते. मात्र नंतर घरगुती तसेच औद्योगिक वापरासाठी मोठ्या प्रमाणात पाणी वळविले गेले. वाढती लोकसंख्या आणि औद्योगिकीकरणामुळे भविष्यातही बिगर-सिंचनाकडे पाणी वळविले जाण्याची शक्यता आहे. आजमितीला अहिल्यानगरमधील गोदावरी कालव्यांचे पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त पाणी बिगर-सिंचनाकडे गेल्याने बारमाही असलेल्या कालव्यांची आठमाहीकडे वाटचाल सुरू झाली आहे. जिल्ह्यातील इतर प्रकल्पांतही कमी-अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे शेती आणि शेतीपूरक उद्योग अडचणीत आले आहेत. जलसंपत्ती नियमनाच्या बदलत्या धोरणामुळे उपलब्ध पाण्याचे सूक्ष्म नियोजन करून कार्यक्षम वापर करणे अपरिहार्य झाले आहे. तुटीच्या खोऱ्यात पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी कोकणातील विपुल पाणी असलेल्या पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे वळविणे हा महत्त्वाचा पर्याय ठरत आहे.

### कोकणातून अहिल्यानगरकडे पाणी वळविण्याच्या योजना

कोकणातील पश्चिमेकडे अरबी समुद्राकडे वाहणाऱ्या नार, पार, अंबिका, दमणगंगा, वैतरणा आणि उल्हास खोऱ्यातील पाणी प्रवाही तसेच उपसा वळण योजनांद्वारे पूर्वेकडे आणण्याच्या संदर्भातील कामे सुरू आहेत. एकूण ३० प्रवाही वळण योजनांद्वारे ७.४० टीएमसी पाणी कोकणातून पूर्वेकडे वळविण्याचे नियोजन आहे. यातील काही योजना पूर्ण झाल्या असून काही प्रगतीत आहेत. गंगापूर, दारणा, मुळा आणि भंडारदरा धरण समूहांना या योजनांचा लाभ मिळणार आहे. अहिल्यानगरमधील गोदावरी कालव्यांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या उर्ध्व वैतरणा-मुकणे प्रवाही वळण योजनेचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे लेखात नमूद केले आहे. तसेच दमणगंगा-एकदरे-गोदावरी आणि दमणगंगा-वैतरणा-गोदावरी-कडवा/देवनदी अशा उपसा वळण योजनांनाही प्रशासकीय मान्यता मिळालेली असून त्यातून विविध भागांना सिंचन, घरगुती आणि औद्योगिक पाणी उपलब्ध होण्याचे नियोजन आहे. उल्हास-वैतरणा खोऱ्यातून भंडारदरा, निळवंडे, मुळा आणि जायकवाडी प्रकल्पातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी सहा महत्त्वाकांक्षी उपसा वळण योजनांद्वारे एकूण ७८ टीएमसी पाणी वळविण्याचे प्रस्तावित आहे. या योजनांचा अंदाजित खर्च सध्याच्या दरानुसार मोठा असून, प्राथमिक व्यवहार्यता अहवालानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला जाणार आहे. क्षेत्रीय परिस्थितीनुसार योजनांची व्याप्ती, खर्च आणि आकडेवारीमध्ये बदल होऊ शकतो.

या योजनांसाठी सर्वेक्षण, तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता, सविस्तर प्रकल्प अहवाल, विविध प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, पर्यावरण मान्यता, पुनर्वसन, जमीन संपादन, केंद्रीय जल आयोग आणि जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या मान्यता अशा विविध बाबींचे नियोजन करण्यात आले आहे. येत्या सात वर्षांत या योजना पूर्ण करण्याचे सूक्ष्म नियोजन असल्याचे लेखात नमूद आहे. या नदीजोड योजनांमुळे अहिल्यानगर, नाशिक तसेच जायकवाडीच्या पाणी तुटीचा प्रश्न निकाली निघण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### स्थानिक जलप्रकल्पांची गरज

या महत्त्वाकांक्षी नदीजोड योजनांबरोबरच साकूर उपसा सिंचन योजना आणि कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर यांसारख्या योजनांनाही प्राधान्य देण्यात आले आहे.

साकूर उपसा सिंचन योजना संगमनेर तालुक्यातील पठारी, अवर्षणप्रवण, दुष्काळी आणि डोंगरी भागासाठी प्रस्तावित आहे. या योजनेद्वारे विविध गावांतील पाझर व गाव तलावांमध्ये पाणी पोहोचविण्याचे नियोजन आहे. गोदावरी, मुळा आणि प्रवरा नदीवरील अस्तित्वातील अनेक कोल्हापूर पद्धतीचे बंधारे ३५-४० वर्षे जुने झाल्याने त्यातून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत आहे. काही बंधारे मोडकळीस आले असून पुरेसा पाणीसाठा होत नाही. त्यामुळे काही बंधाऱ्यांचे विशेष दुरुस्तीअंतर्गत उचल पद्धतीच्या यांत्रिक दरवाजायुक्त बॅरेजमध्ये रूपांतर करण्याचे काम प्रायोगिक तत्त्वावर हाती घेण्यात आले आहे. दक्षिण अहिल्यानगरमधील कुकडी प्रकल्पांतर्गत उपलब्ध पाण्याच्या तुलनेत सिंचन क्षेत्र मोठे आहे. त्यामुळे अपेक्षित पाणी आणि प्रत्यक्ष उपलब्ध पाणी यातील तफावत भरून काढणे आवश्यक आहे. श्रीगोंदा तालुक्यातील साकळाई उपसा सिंचन योजना आणि ताजनापूर उपसा सिंचन योजना टप्पा-२ यांसारख्या प्रकल्पांकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

### उद्याची जलक्रांती

अहिल्यानगर जिल्ह्याने पाण्यासाठी दीर्घ संघर्ष केला आहे. मोठी धरणे, कालवे, बंधारे, उपसा सिंचन योजना, जलसंधारणाची कामे आणि नदीजोड योजनांच्या माध्यमातून जिल्ह्याची जलव्यवस्था सातत्याने विकसित होत आली आहे.

आज मात्र आव्हानाचे स्वरूप बदलले आहे. पाणी निर्माण करण्यापेक्षा उपलब्ध पाण्याचे संवर्धन, अचूक नियोजन, कार्यक्षम वापर आणि न्याय्य वाटप अधिक महत्त्वाचे झाले आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पावसाचा प्रत्येक थेंब अडविणे, भूजल पुनर्भरण वाढविणे, शेतीतील पाणी वापर कार्यक्षम करणे आणि बिगर-सिंचन पाण्याचा शास्त्रीय नियोजनबद्ध वापर करणे ही काळाची गरज आहे. मोठ्या प्रकल्पांसोबत स्थानिक जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, शेततळी, पुनर्भरण, सांडपाण्याचा पुनर्वापर आणि नदीजोड यांचा समन्वय साधला तरच भविष्यातील जलसुरक्षा मजबूत होईल.

अहिल्यानगरची जलगाथा ही केवळ धरणे आणि कालव्यांची कथा नाही; ती दुष्काळाशी केलेल्या संघर्षाची, उपलब्ध पाण्याचे नियोजन करण्याच्या प्रयत्नांची आणि भविष्यातील पिढ्यांसाठी जलसुरक्षित जिल्हा निर्माण करण्याच्या संकल्पाची कथा आहे.

आजवरच्या जलविकासाने अहिल्यानगरच्या कृषी, सामाजिक आणि आर्थिक विकासाला भक्कम आधार दिला आहे. आता बदलत्या हवामानाच्या काळात या वारशाला आधुनिक नियोजनाची जोड देऊन पुढील वाटचाल करावी लागणार आहे. आजचे पाणी जपले, नियोजनबद्ध वापरले आणि उद्याच्या पिढीचा हक्क अबाधित ठेवला, तरच अहिल्यानगरची जलक्रांती सर्वार्थाने साकार होईल.

## इंजि. उत्तमराव निर्मळ -

### संक्षिप्त परिचय व जीवनपट

उत्तमराव निर्मळ यांचा जन्म १ जून १९५८ रोजी मौजे पिंपरी निर्मळ, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथील शेतकरी कुटुंबात झाला. जिल्हा परिषद मराठी शाळेतून प्राथमिक शिक्षण, त्यानंतर रयत शिक्षण संस्थेतून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून त्यांनी १९७५ मध्ये एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण केली. १९७५ ते १९७७ या काळात पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयात शिक्षण घेतल्यानंतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथून १९८१ मध्ये बी.ई. (सिव्हिल) पदवी संपादन केली.

अभियांत्रिकी शिक्षणानंतर त्यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना, प्रवरानगर येथे १९८१ ते १९८७ या काळात सेवा बजावली. या काळात वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालये, पॉलिटेक्निक, रुग्णालये, शाळा, वसतिगृहे, कर्मचारी निवासस्थाने, गोदामे, रस्ते तसेच लिफ्ट सिंचन योजनांसह विविध बांधकाम प्रकल्पांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (चझडउ) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर १५ जून १९८७ रोजी त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागात प्रवेश केला. तब्बल २९ वर्षांच्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी नाशिक, अहिल्यानगर, औरंगाबाद, जळगाव आणि पुणे जिल्ह्यांत सहाय्यक अभियंता श्रेणी-१ ते कार्यकारी अभियंता या विविध पदांवर काम केले. ३१ मे २०१६ रोजी ते कार्यकारी अभियंता पदावरून सेवानिवृत्त झाले.

जलसंपदा विभागातील कारकिर्दीत सिंचन पाणी व्यवस्थापन, धरणे, कालवे व वितरण व्यवस्था, नदीखोरे जलनियोजन, जलविज्ञान, नदीजोड व पाणी वळविण्याच्या योजना, पूररेषा व पूरसंरक्षण, धरण सुरक्षा, जलसंधारण, भूगर्भीय व कृषी-जल व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत त्यांनी काम केले. पालखेड, दारणा-गंगापूर-कडवा, भंडारदरा-निळवंडे, मुळा, कुकडी-विसापूर, नांदूर मधमेश्वर तसेच विविध मध्यम व लघु प्रकल्पांशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध राहिला. पश्चिमेकडील पाणी पूर्वेकडे वळविण्याच्या संकल्पना आणि जलनियोजनाच्या विविध कामांमध्येही त्यांनी योगदान दिले.

त्यांच्या जीवनप्रवासात आई-वडिलांचे संस्कार, पत्नी सौ. सुनंदा निर्मळ यांचा खंबीर आधार, विद्यार्थी सहाय्यक समितीचा जिव्हाळ्याचा सहवास, तसेच वरिष्ठ अधिकारी, सहकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, मित्र आणि जनतेचे सहकार्य यांना ते विशेष महत्त्व देतात. विशेषतः पद्मभूषण स्व. डॉ. ए.वि. उर्फ बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली काम करण्याची संधी ही त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाची प्रेरणादायी पर्वणी ठरली.

अभियांत्रिकी शिक्षणापासून जलसंपदा क्षेत्रातील प्रदीर्घ सेवापर्यंतचा त्यांचा प्रवास हा तांत्रिक ज्ञान, कर्तव्यनिष्ठा, अनुभव, नियोजनदृष्टी आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचा प्रवास आहे. निवृत्तीनंतरही जलसंपदा, जलनियोजन आणि अहिल्यानगरच्या पाणीप्रश्नांवर चिंतन व लेखनाच्या माध्यमातून ते आपला अनुभव समाजासमोर मांडत आहेत. त्यांच्या मते, आयुष्य घडविण्यात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे ऋण मान्य करून ते त्या सर्वांच्या ऋणात राहणे पसंत करतात.



भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या




देशाच्या प्रगतीत अमूल्य योगदान देणाऱ्या सर्व अभियंत्यांना अभियंता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

भारताचे महान अभियंता आणि भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंती निमित्ताने त्यांना शतशः नमन !









- Civil works
- Construction
- Road Development
- Public Infrastructure
- Bridges
- Dams
- Building Projects.

*Building dreams, shaping the future.*



TBG
GROUP MAHARASHTRA

## M/S. TUSHAR BHAUSAHEB GITE

(Government Registered Contractor)

Er. Tushar Gite | Er. Balasaheb Gite

**Office Address -**
Office No. 5, Saideep Complex, Maldad Phata,
Opposite to Mazhe Ghar Society,
Ghulewadi, Sangamner - 422605

**Mobile Number -**
7263989832



शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीत सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा

युवावार्ता ( प्रतिनिधी )

संगमनेर- संपूर्ण देशासाठी सहकाराचे आदर्श मॉडेल ठरलेल्या अमृत उद्योग समूहामधील विविध सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल व कृषीमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या उपस्थितीमध्ये गुरुवार दिनांक १७ सप्टेंबर २०२६ ते २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत कारखाना कार्यस्थळावरील कारखान्याच्या नवीन प्रशासकीय इमारती समोरील अमृतेश्वर मंदिराच्या प्रांगणात होणार आहे.

थोर स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श विचारांवर संगमनेर मधील अमृत उद्योग समूहातील विविध सहकारी संस्थांचे कामकाज हे देशासाठी उत्तम मॉडेल ठरले आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली या सर्व सहकारी संस्थांमधून तालुक्याच्या ग्रामीण विकासासह शेतकरी, उत्पादक, नागरिक, महिला, व्यापारी, कामगार या सर्वांचा विकास साधला जात असून या सहकारी संस्थांमुळे तालुक्याची अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. या आदर्शवत सर्व सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा १७ सप्टेंबर २०२६ ते २० सप्टेंबर २०२६ या काळात कारखान्याच्या नवीन प्रशासकीय इमारती समोरील अमृतेश्वर मंदिराजवळील प्रांगणात मा.महसूल व कृषीमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे व तालुक्यातील सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. गुरुवार १७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वा. संगमनेर सहकारी शेतकी संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन संपतराव डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सहकारी बँक संगमनेर मार्केट यार्ड शाखा सह्याद्री शाळेजवळ होणार आहे. तर दुपारी १ वा. संगमनेर तालुका



सहकारी दूध उत्पादक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन रणजीतसिंह देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली कारखाना कार्यस्थळावर अमृतेश्वर मंदिरासमोरील प्रांगणात होणार आहे. शुक्रवार दिनांक १८ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वा. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा विद्यमान चेअरमन माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

शनिवारी सकाळी ११ वा.वडगाव पान येथील कृषी उत्पन्न बाजार समिती उपबाजार येथे सभापती शंकरराव खेमनर यांच्या अध्यक्षतेखाली कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा होणार आहे. तर रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता अमृतवाहिनी बँक येथील हॉलमध्ये गरुड कुक्कुटपालन सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा राजेंद्र कडलग यांच्या अध्यक्षतेखाली तर १०.३० वाजता हरिश्चंद्र फेडरेशन पाणीपुरवठा सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन राजेंद्र गुंजाळ यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. रविवारी दुपारी १ वा. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन सुधाकर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली अमृतेश्वर मंदिरासमोरील प्रांगणात होणार आहे. या सर्व वार्षिक सर्वसाधारण सभांना आमदार सत्यजित तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात, ड.माधवराव कानवडे, बाजीराव पा.खेमनर, सौ.दुर्गाताई तांबे, इंद्रजीत भाऊ थोरात, रामहरी कातोरे, हौशीराम सोनवणे यांच्यासह अमृत उद्योग समूहातील सर्व संस्थांचे पदाधिकारी व तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तरी या वार्षिक सर्वसाधारण सभांसाठी सभासद व उत्पादक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कारखान्याचे व्हा.चेअरमन पांडुरंग पाटील घुले, दूध संघाचे व्हा.चेअरमन राजेंद्र चकोर, बँकेचे व्हाईस चेअरमन ड.नानासाहेब शिंदे, शेतकी संघाचे व्हा.चेअरमन सुनील कडलग, मार्केट कमिटीचे उपसभापती गीताराम गायकवाड, कारखान्याचे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांच्यासह थोरात सहकारी साखर कारखाना कारखाना, राजहंस दूध संघ, अमृतवाहिनी बँक, शेतकी संघ, हरिश्चंद्र फेडरेशन, गरुड कुक्कुटपालन या सर्व सहकारी संस्थांच्या संचालक मंडळ व कार्यकारी संचालक यांनी केले आहे.

## धांदरफळ खुर्द सबस्टेशन वर शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात अनेक गावांमध्ये मागील अनेक दिवसांपासून विजेचा पुरवठा सुरळीत सुरू नाही. याबाबत सातत्याने निवेदन देऊनही वीज विभाग कोणत्याही प्रकारची कार्यवाही करत नाही. त्यामुळे धांदरफळ खुर्द सबस्टेशनवर शेतकऱ्यांनी आक्रोश मोर्चा काढला.

धांदरफळ खुर्द सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या धांदरफळ पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने एकत्रित वीजपुरवठ्याच्या विविध समस्यांबाबत वीज अधिकाऱ्यांना निवेदन दिले. यावेळी उपकार्यकारी अभियंता रमेश घुगे ज्युनिअर इंजिनिअर पवार तसेच सातभाई साहेब यांच्या समोर शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी सांगितल्या. व या मागण्या आठ दिवसात सुटल्या नाही तर तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही त्यांनी यावेळी निवेदनातून दिला आहे.

शेतकऱ्यांनी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या शेतीसाठी तीन फेज वीज पुरवठ्याची वेळ रात्री ९. ४५ ते पहाटे ५.४५ अशी आहे. संपूर्ण अंधारात शेतकऱ्यांना शेतीला पाणी देण्यासाठी जावे लागत आहे परिसरात वन्य प्राण्यांची भीती असताना रात्रीच्या वेळी शेतीला पाणी देणे अत्यंत धोकादायक आहे. दररोज संध्याकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत लोड शेडिंग केले जाते. ते लोड शेडिंग ग्रामीण भागातच करण्यात येत आहे. अशा या महावितरणच्या चुकीच्या नियोजनामुळे शेतकऱ्यांना मोठी अडचण होत आहे. या समस्या पुढील आठ दिवसात सुटल्या नाही तर तीव्र स्वरूपात आंदोलन छेडले जाईल असा इशाराही यावेळी आंदोलकांनी दिला. यावर उपकार्यकारी अभियंता रमेश घुगे यांनी सर्व समस्या सोडवण्याचे आश्वासन उपस्थितांना दिले. यावेळी धांदरफळ खुर्द, धांदरफळ बु, निमगाव ,निमगाव बुद्रुक, पेमगिरी, नांदुरी, सांगवी, कवठे, निमज या गावातील शेतकरी युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तालुक्यात सायंकाळी सहा ते नऊ या वेळेत अनेक ठिकाणी लोड शेडिंग होत असते त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास शेतकऱ्यांना शेतीची कामे, गोठ्यातील कामे सर्व याच वेळेत करावयाचे असतात त्यामुळे या वेळेमध्ये लोड शेळी करू नये याकरता डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले होते. शेतकऱ्यांना सुरळीत व पूर्ण दाबाने वीज पुरवठा करावा ही मागणी सातत्याने केली जात आहे**

## कळस बु. शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी निसाळ तर उपाध्यक्षपदी हुलवळे





युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - कळस बू जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी ज्ञानदेव निसाळ तर उपाध्यक्ष पदी सोनाली हुलवळे यांची निवड झाली आहे.

अकोले तालुक्यात शैक्षणिक दृष्ट्या सर्वात मोठी शाळा असणाऱ्या कळस बु. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची बैठक संपन्न झाली. यावेळी ही निवड करण्यात आली. पालक सभेत सदस्यांची निवड करण्यात आली होती या मध्ये माजी अध्यक्ष शंकर किसन जाधव, अनिल देवराम वाकचौरे, सुरेश शांताराम वाकचौरे, सोमनाथ विलास कवडे, ज्ञानदेव अशोक निसाळ मनीषा ज्ञानेश्वर बोऱ्हाडे, सोनाली जयराम हुलवळे, वनिता संदेश वाकचौरे, मनीषा सचिन चौधरी, दगडू सावंत, सोनाली विलास भुसारी, नयना शिरीष चव्हाण, शितल शिवाजी कातोरे, वसंत बाळासाहेब ढगे, शिक्षण तज्ञ दत्तात्रय शिवराम वाकचौरे, आरोग्य सेविका पुष्पा भुतांबरे, शिक्षक प्रतिनिधी सकाहारी दादाभाऊ दाते, यांची निवड करण्यात आली. सचिव म्हणून मुख्याध्यापक तान्हाजी खंडेराव वाजे यांनी कामकाज पाहिले.

श्री. ज्ञानदेव निसाळ ही अनेक वर्षांपासून शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य म्हणून कामकाज पाहत होते. त्यांचे जिल्हा परिषद शाळेच्या कार्यक्रमांमध्ये मोलाचे योगदान आहे. ते भारतीय जनता पार्टीचे अकोले तालुका उपाध्यक्ष आहेत. सोनाली हुलवळे यांनी यापूर्वी शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद भूषवले आहे.

त्यांच्या या निवडीचे जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम समितीचे माजी सभापती कैलासराव वाकचौरे, सोन्याबापू वाकचौरे गुरुजी, कळस सोसायटी चेअरमन विनय वाकचौरे, जयकिसान सहकारी दूध संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब वाकचौरे, ग्रामपंचायत प्रशासक राजेंद्र गवांदे, कळसेश्वर विद्यालय शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोरख वाकचौरे आदींनी अभिनंदन केले आहे.

## संगमनेर व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षपदी शरद गांडोळे यांची निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर व्यापारी असोसिएशनच्या अध्यक्षपदी येथील व्यापारी शरद गांडोळे यांची, तर उपाध्यक्षपदी सुमेध संत सचिवपदी कपिल टाक, सहसचिवपदी शेखर गाडे आणि खजिनदारपदी विशाल पडतानी यांची एकमताने निवड करण्यात आली.

संगमनेर व्यापारी असोसिएशनची ६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेच्या कार्यालयात उत्साहात पार पडली. या सभेत संस्थेच्या नूतन पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली. सभेच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे मावळते अध्यक्ष योगेश कासट होते. यावेळी संस्थेचे सचिव शरद गांडोळे, जुगलकिशोर बाहेती, सुमेध संत यांच्यासह व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

व्यापारी बांधवांच्या विविध अडचणी व प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी असोसिएशनच्या माध्यमातून प्रभावी पणे काम केले जाईल तसेच व्यापारी वर्गासमोरील प्रश्नांबाबत शासकीय स्तरावर पाठपुरावा केला जाईल असे नूतन अध्यक्ष शरद गांडोळे यांनी सांगितले.नूतन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल व्यापारी वर्गातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## डॉ. रत्नाकर महाजन यांचे निधन



अहिल्यानगर - राज्य नियोजन मंडळाचे माजी कार्यकारी अध्यक्ष, लोकबोधिनी संस्थेचे अध्यक्ष, काँग्रेसचे माजी प्रवक्ते तसेच ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, राजकीय विश्लेषक व अभ्यासक डॉ. रत्नाकर महाजन यांचे सोमवारी रात्री दुःखद निधन झाले.

राजकीय, सामाजिक आणि वैचारिक क्षेत्रात त्यांनी दीर्घकाळ मोलाचे योगदान दिले. अभ्यासपूर्ण मांडणी, समाजवादी विचारांची बांधिलकी आणि मार्गदर्शकाची भूमिका यामुळे त्यांचा मोठा चाहतावर्ग होता. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## भाजपा नेत्या आशाताई बुचके यांचे निधन



जुन्नर (प्रतिनिधी)

जुन्नरच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील आक्रमक महिला नेतृत्व म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेच्या माजी गटनेत्या आशा बुचके यांचे दुःखद निधन झाले आहे. ग्रामीण भागातील प्रश्न, विकासकामे आणि स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांवर त्या आक्रमकपणे भूमिका मांडत असत. सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी खंबीरपणे उभे राहणे हीच त्यांच्या राजकारणाची खरी ओळख राहिली.

त्यांच्या लढाऊ आणि स्पष्टवक्त्या स्वभावामुळे त्या जुन्नरच्या राजकारणात चर्चेत राहिल्या. मात्र त्यांच्या निधनामुळे पुणे जिल्हा आणि जुन्नर तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

## संगमनेर एमबीएच्या विद्यार्थ्यांनी अनुभवले प्रत्यक्ष व्यवस्थापनाचे धडे




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमबीए महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व्यवस्थापनाच्या विविध कौशल्य शिक्षण संपादन करण्यासाठी व विविध कौशल्ये संपादन करण्यासाठी एमबीए विद्यार्थी समूहाने हायर अप्लायन्सेस इंडिया प्रा. लि., रांजणगाव एमआयडीसी, पुणे येथे औद्योगिक भेट देवून व्यवस्थापन कौशल्याची माहिती घेतली. या वेळी महाविद्यालयातील विभाग प्रमुख व औद्योगिक समन्वयक प्रा. संतोष खामकर उपस्थित होते

वर्गातील सैद्धांतिक ज्ञानाला उद्योग विश्वातील प्रत्यक्ष कार्यपद्धतीची जोड देणे हा या भेटीमागील प्रमुख उद्देश होता. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी कंपनीतील उत्पादन व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण, तंत्रज्ञानाचा वापर, मनुष्यबळ व्यवस्थापन, औद्योगिक शिस्त आणि कार्यक्षमतेच्या विविध पद्धतींची माहिती घेतली. आधुनिक उत्पादन उद्योगामध्ये नियोजन, टीमवर्क, वेळेचे व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान यांची भूमिका विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून समजली. व्यवस्थापन करतांना अन्य कोणत्या कौशल्याचे संपादन आवश्यक आहे याची माहिती प्रत्यक्ष भेटून विद्यार्थ्यांनी घेतली. कंपनीचे ह्यूमन रिसोर्स अँड डमिनिस्ट्रेशन श्री. स्वप्नील वाघमारे तसेच एच.आर. मॅनेजर सौ. स्वीटी सिरसे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत उद्योगातील कार्यसंस्कृती, कर्मचारी व्यवस्थापन आणि संस्थात्मक विकास याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध विभागांना भेट देऊन उद्योगातील प्रत्यक्ष कामकाजाची माहिती जाणून घेतली. औद्योगिक भेटीचे नियोजन व समन्वय प्रा. महेश पावडे, डॉ. विद्देश अंदुरे व प्रा. प्रतिमा गाडे यांनी केले . विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील बदलती आव्हाने आणि व्यवस्थापनाच्या प्रत्यक्ष संधी समजून घेण्यासाठी ही भेट उपयुक्त ठरली. व्यवस्थापन शिक्षण केवळ वर्गखोलीपुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना उद्योगाच्या प्रत्यक्ष वातावरणाचा अनुभव मिळणे आवश्यक आहे, असे मत विभागप्रमुख डॉ. किरण गोटे यांनी व्यक्त केले. औद्योगिक संपर्कामुळे विद्यार्थ्यांच्या निर्णयक्षमता, निरीक्षणशक्ती आणि व्यावसायिक दृष्टिकोनाला अधिक व्यापकता मिळते, असे संचालक डॉ. नितीन झावरे यांनी सांगितले. या भेटीदरम्यान मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमाच्या यशस्वीतेबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, सचिव डॉ. राजेंद्र लड्डा तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले.

## ज्ञानमातेच्या विद्यार्थ्यांचे पर्यावरण पूरक पाऊल



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर शहरातील ज्ञानमाता विद्यालयातील विद्यार्थ्यांची पर्यावरण पूरक शाडूच्या मातीचे गणपती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. सदर शाडूच्या माती पासून तयार केले जाणारे गणपती हे निश्चितच पर्यावरण पूरक असणार आहे याची जाणीव विद्यार्थ्यांना सदर कार्यशाळेतून झाली. या माती पासून गणपती तयार करण्याच्या उपक्रमात शेतातील चाळून घेतलेली काळी माती, तसेच सेंद्रिय रंगांचा वापर केला गेला. सध्या स्वस्त मिळतात म्हणून प्लास्टर ऑफ पॅरिस चा वापर केलेल्या गणेश मूर्ती, विसर्जन केल्यानंतर लवकर पाण्यात विरघळत नाही त्या तशाच राहतात यापेक्षा शाडूच्या मातीच्या मूर्ती पर्यावरण पूरक असल्याचा अनुभव सदर उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आला. या कार्यशाळेमुळे भविष्यामध्ये विद्यार्थी पर्यावरण पूरक गणपती बनवतील ज्यातून प्रदूषण कमी करण्यास हातभार लागेल. या कार्यशाळेत इयत्ता पाचवी ते आठवी वर्गातील एकूण ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सदर शाडूच्या मातीच्या गणपती बनविण्याच्या कार्यशाळेत कलाशिक्षिका सौ प्राजक्ता कासार, श्री आदित्य कोळगे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्याचबरोबर ज्ञानवता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर उपप्राचार्य अर्चना डोंगरे मॅडम पर्यवेक्षक फादर प्रशांत शहराव, कनिष्ठ महाविद्यालयाच्या समन्वयक शारदा नवले मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व प्रोत्साहन दिले.




दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com






# भंडारदरा धरणातून आवर्तन सुरू

## खरीप पिकांना दिलासा; गणेश विसर्जनासाठीही पाण्याची उपलब्धता

युवावार्ता (प्रतिनिधी)

भंडारदरा पाणलोटात शनिवारपासून मान्सून पुन्हा सक्रिय झाल्याने भंडारदरा धरणात नवीन पाण्याची आवक सुरू झाल्याने रविवारी सायंकाळी ११०३९ क्षमतेच्या धरणातून ३१४७ क्युसेकने विसर्ग सोडण्यात येत आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असल्याने जशी आवक होत आहे. त्याप्रमाणात प्रवरा नदीपात्रात सोडण्यात येत आहे. पाऊस वाढल्यास विसर्गही वाढविण्यात येणार आहे.



निळवंडे धरणात ८३२४ दलघफू पाणी असून २३५७ क्युसेकने विसर्ग प्रवरा नदीत सोडण्यात येत आहे. वाकी तलावातही आवक होत असल्याने या तलावातून १९७ क्युसेकने पुन्हा विसर्ग सुरू झाला आहे. रविवारी सकाळपर्यंत नोंदविला गेलेला पाऊस असा (मिमी)- भंडारदरा २१, निळवंडे ११, रतनवाडी २०, घाटघर ३१, वाकी १८.

मुळा पाणलोटातही पाऊस सुरू - मुळा पाणलोटातही शनिवारपासून हलकासा पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे मुळा नदीतील विसर्ग काहीसा वाढला आहे. २६००० दलघफू क्षमतेच्या या धरणांत २३०४९ दलघफू (८८.६५ टक्के) साठा असून कोतूळ येथे मुळा नदीचा ६२५ क्युसेक होता. भंडारदरा लाभक्षेत्रातील शेतकर्यांच्या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रवरा डाव्या आणि उजव्या कालव्यातून खरीपाचे आवर्तन सोडण्याच्या सूचना जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागाच्या अधिकार्यांना दिल्या. लाभक्षेत्रात यंदाच्या वर्षी सरासरीइतका पाऊस न झाल्यामुळे खरीप पिके धोक्यात आली आहेत. त्यामुळे शेती पिकांसाठी तसेच काही गावांमधील पाणीपुरवठा योजनांना पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने आवर्तन सुरू करावे, अशी मागणी लोकप्रतिनिधींसह शेतकर्यांनी जलसंपदामंत्री विखे पाटील यांच्याकडे केली होती. मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीतही प्रामुख्याने खरीप पिकांना जीवदान मिळावे म्हणून आवर्तनाच्या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली होती. धरणातील उपलब्ध पाण्याचा आढावा घेऊन जलसंपदा मंत्र्यांनी सोमवार १४ सप्टेंबर पासून खरीप पिकांसाठी आवर्तन सोडण्याचे निर्देश दिले आहेत.

# सिद्धार्थ नाईट हायस्कूल अंधारात; स्मार्ट मीटरचा फटका

## दिवसभर कष्ट, रात्री शिक्षण... विद्यार्थ्यांच्या भवितव्यावरच अंधाराचे सावट

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

एसएससी बोर्ड परीक्षेत जिल्ह्यात प्रथम आणि पुणे बोर्डात द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या संगमनेरच्या सिद्धार्थ नाईट हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना आज मात्र अंधारात शिक्षण घ्यावे लागत असल्याची संतापजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. दिवसभर कष्ट करून रात्री शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाट्याला वीजपुरवठ्याच्या समस्येमुळे अंधार येत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बहुजन शिक्षण संघ संस्थेअंतर्गत माजी मंत्री दादासाहेब रुपवते यांच्या प्रेरणेतून १९७० पासून ही रात्रशाळा कार्यरत असून, सध्या १७० विद्यार्थी, त्यामध्ये ७८ मुली शिक्षण घेत आहेत. गरीब वंचित घटकातील विद्यार्थ्यांसाठी ही शाळा महत्त्वाची आधारवड ठरली आहे. दरम्यान, जुन्या मीटरऐवजी शाळेला विश्वासात न घेता स्मार्ट मीटर बसविल्यानंतर दरमहा ३ ते ४ हजार रुपयांचे वीज बिल येत असल्याचे मुख्याध्यापक विकास जगताप यांनी सांगितले.

शासनाकडून या खर्चासाठी स्वतंत्र अनुदान नसल्याने बिलाचा भरणा करणे कठीण झाले असून, वीजपुरवठा खंडित करण्याच्या नोटिसाही प्राप्त होत आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर वर्गातील दिवे-पंखे, मैदानावरील खेळांचे प्रशिक्षण आणि शैक्षणिक उपक्रमांवर परिणाम होत आहे. तसेच अंधाऱ्या प्रांगणामुळे साप-विंचवांचा धोका निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न गंभीर झाला आहे. याबाबत वारंवार पत्रव्यवहार करूनही ठोस उपाययोजना झालेली नसल्याची खंत मुख्याध्यापक विकास जगताप व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ए.पी. बनसोडे यांनी व्यक्त केली.

रात्रशाळेला सौरऊर्जा व्यवस्था उपलब्ध करून द्यावी किंवा नियमित वीजपुरवठ्यासाठी तातडीने स्वतंत्र उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याला प्रकाश देणाऱ्या शाळेलाच अंधारात ठेवण्याची वेळ प्रशासनावर का आली, असा संतप्त सवाल पालक व नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

# दैनिक युवावार्ता कार्यालयात बाप्पा विराजमान



संगमनेर – दैनिक युवावार्ता कार्यालयात गणरायाची विधिवत स्थापना करून संपादक सुशीला किसन हासे व संपादक किसन भाऊ हासे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. याप्रसंगी संचालक आनंद हासे, कार्यकारी संपादक सुदीप हासे, संचालिका पुजा हासे, प्रियंका हासे व युवावार्ता परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# आदर्श शेतीचा ध्यास घेतलेले पतिंगराज पोपटराव राऊत

## कष्ट, आधुनिक तंत्रज्ञान आणि सामाजिक बांधिलकीच्या जोरावर शेतीला व्यवसायाचे स्वरूप देणारा प्रयोगशील शेतकरी



संगमनेर : घुलेवाडी गावात नाशिक-पुणे महामार्गालगत, संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाच्या प्रक्रिया प्रकल्पासमोरून जाताना सर्वांचे लक्ष वेधून घेणारी हिरवीगार, नियोजनबद्ध आणि आधुनिक पद्धतीने फुलवलेली शेती दिसते. ही शेती म्हणजे राऊत कुटुंबाच्या कष्टाची आणि जिद्दीची साक्ष आहे. याच कुटुंबातील पतिंगराज पोपटराव राऊत यांनी आपल्या आई-वडिलांच्या कष्टांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवत शेती व दुग्ध व्यवसायाला आपल्या जीवनाचा प्रमुख व्यवसाय बनविला आहे.

कै. पोपटराव काशिनाथ राऊत आणि त्यांच्या पत्नी कै. गिझानबाई यांनी बारा एकर पडीक क्षेत्रावर अथक परिश्रम घेत शेती फुलवली. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी कष्ट, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर या जमिनीचे रूप पालटले. आई-वडिलांनी उभ्या केलेल्या या कष्टाच्या संस्कारांची जाणीव पतिंगराज यांच्या मनात कायम राहिली. त्यामुळे पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी नोकरीच्या मागे न लागता शेती आणि दुग्ध व्यवसायालाच आपला चरितार्थाचा मार्ग स्वीकारला. मात्र, पारंपरिक शेतीपुरते मर्यादित न राहता 'शेतीत नवनवीन प्रयोग आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर' हा दृष्टिकोन त्यांनी स्वीकारला. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी त्यांनी विविध प्रशिक्षणांमध्ये सहभाग घेतला. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे येथे आयोजित 'ऊस शेती ज्ञानयाग' प्रशिक्षणात पाच दिवस सहभागी होण्याची संधी त्यांना मिळाली. तसेच विविध अभ्यास दौरे व प्रशिक्षण कार्यक्रमांतून त्यांनी आधुनिक शेतीचे ज्ञान आत्मसात केले.

शेतात शिकलेले तंत्रज्ञान प्रत्यक्ष राबविण्यावर त्यांचा विशेष भर आहे. मका, ऊस, घास आदी पिकांचे स्वतंत्र प्रात्यक्षिक प्लॉट तयार करून त्यांनी प्रयोगशील शेतीचा आदर्श निर्माण केला. राजहंस दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ९ जुलै २०१७ रोजी शेतकऱ्यांसाठी चारा पीक म्हणून मक्यामध्ये 'डव्हान्टा' कंपनीच्या चारा पिकाची पाहणी त्यांच्या शेतात आयोजित करण्यात आली होती. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी कांदा पीक क्षेत्राबाबत वृत्तवाहिनीच्या माध्यमातून त्यांच्या शेतातून माहिती व मुलाखतही घेण्यात आली.

शेतकरी प्रश्नांबाबतही पतिंगराज राऊत यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. २ जून २०१७ रोजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या उपस्थितीत शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शेताच्या बांधावरून झालेल्या लाईव्ह कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला होता. शेतकरी, शेती आणि ग्रामीण विकासाच्या प्रश्नांबाबत असलेली त्यांची आस्था यातून दिसून येते. त्यांच्या प्रयोगशील आणि प्रगतिशील शेतीची दखल शासन व विविध संस्थांनीही घेतली आहे. जिल्हा परिषद, अहमदनगर कृषी विभागाच्या वतीने 'प्रगतिशील शेतकरी पुरस्कार' (२०१६-१७) तसेच स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्याचा 'राज्यस्तरीय कृषिभूषण पुरस्कार' (२०२३) देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. शेतीसोबतच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातही पतिंगराज राऊत यांचा सक्रिय सहभाग आहे. अमृतवाहिनी मॉडेल स्कूल व कॉलेजमध्ये २० ऑगस्ट २०२२ रोजी पालक प्रतिनिधी म्हणून निवड होऊन त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातही योगदान दिले. २०२५ मध्ये सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या ऊस पीक लागवड कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतला. तर २६ जून २०२५ रोजी वीज बिलाचा वेळेत भरणा करणारे ग्राहक म्हणून महावितरण संगमनेरकडून स्मार्ट वॉच देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

सध्या पतिंगराज राऊत हे विविध विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, घुलेवाडीचे व्हाईस चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. तसेच भारत अभिनव सहकारी संस्था मर्या., गुंजाळवाडीचे संचालक म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत. सामाजिक, राजकीय आणि धार्मिक उपक्रमांमध्ये त्यांचा नेहमीच हिरिरीने सहभाग असतो. माजी महसूलमंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात तसेच नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणूनही ते कार्यरत आहेत. आज राष्ट्रीय महामार्गालगतच्या त्यांच्या शेतीतील काही भागात रिलायन्स उद्योग समूहाचा पेट्रोल पंप आकारास आला असून, लवकरच तो नागरिकांच्या सेवेत दाखल होणार आहे. शेतीकडे केवळ पारंपरिक व्यवसाय म्हणून न पाहता आधुनिक तंत्रज्ञान, प्रयोगशीलता आणि नियोजनाच्या माध्यमातून त्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यवसायाचे स्वरूप देता येते, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला आहे. कुटुंबातील सर्व बहिणी, भाऊ, चुलते आणि नातेवाईक यांच्याशी उत्तम समन्वय राखत कुटुंबाला एकत्रितपणे पुढे नेण्याचे कामही पतिंगराज राऊत सातत्याने करीत आहेत. आई-वडिलांनी दिलेला कष्टाचा वारसा आणि संस्कार जपत त्यांनी आपल्या कुटुंबासोबतच परिसरातील शेतकऱ्यांसाठीही प्रेरणादायी वाटचाल केली आहे. शेतीचा ध्यास, आधुनिकतेची कास, सामाजिक कार्याची आस आणि कुटुंबाला एकत्र घेऊन पुढे जाण्याची वृत्ती या गुणांमुळे पतिंगराज पोपटराव राऊत हे घुलेवाडी परिसरातील एक आदर्श व प्रयोगशील शेतकरी म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत. अशा कर्तृत्ववान, प्रयोगशील व मनमिळाऊ व्यक्तिमत्त्वास वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! त्यांच्या हातून शेती, समाज आणि सहकार क्षेत्राची अशीच निरंतर सेवा घडत राहो आणि त्यांच्या भावी वाटचालीस यश, समृद्धी व उत्तम आरोग्य लाभो, हीच सदिच्छा!

**संजय नामदेव आहिरे**
**उपसंपादक, दैनिक युवावार्ता**
















दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25